शुक्रवार, ७ जुलै २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२९२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 07 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-292 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


# पक्ष फोडणाऱ्यांना किंमत मोजावी लागेल

## शरद पवार : अजित पवारांसह ९ आमदार, दोन खासदार निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : राष्ट्रवादी पक्षात कोणतीही फूट नाही. ज्यांनी पक्षाशी द्रोह करुन शिंदे-फडणवीस यांच्या सरकारमध्ये सामिल होण्याचा निर्णय घेतला त्यांच्यावर आम्ही निलंबनाची कारवाई केली आहे. आजच्या कार्यकारिणीत आम्ही ८ महत्त्वाचे ठराव पारित केलेले आहेत. समोरील गट काही नियुक्त्या करत असेल, काही ठराव पारित करत असेल तर ते निरर्थक आहेत. एक मात्र नक्की पक्ष फोडणाऱ्यांना त्याची किंमत मोजावी लागेल, असा निर्वाणीचा इशारा देतानाच तुम्ही निवृत्ती कधी घेणार? असा प्रश्न विचारणाऱ्या अजित पवार यांना राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी सडेतोड उत्तर दिले.**



अजित पवार यांनी प्रमुख नेत्यांसह बंड केल्यानंतर पक्षावर ताबा मिळविण्यासाठी कायदेशीर हालचाली सुरु केल्या आहेत. त्या हालचालींना 'ब्रेक' लावण्यासाठी शरद पवार यांनी राजधानी नवी दिल्लीत तातडीची बैठक बोलावली. या बैठकीत त्यांनी महत्त्वाचे ठराव पारित करताना अजितदादा गटाला झटका दिला. शरद पवारच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याचा कार्यकारिणीने एकमताने ठराव मंजूर केला. तसेच बंड केलेल्या नेत्यांचं निलंबनही कार्यकारिणीने एकमताने मंजूर केले. बैठकीनंतर शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. शरद पवार यांचं राजकारण तसेच त्यांनी घेतलेल्या अनेक निर्णयांची अजित पवार यांनी बुधवारी चिरफाड केली. वय वर्ष ८२ झाले तरी ते थांबण्याचे नाव घेत नाहीत. ते निवृत्त का होत नाही ? असा जळजळीत सवाल अजितदादांनी विचारला. कुणी ८२ म्हणो की ९२... मी जोपर्यंत सक्षम आहे, माझं काम जोमाने करत राहणार, अशा शब्दात उत्तर देताना 'इथे थांबणे नाहीच...' असंच शरद पवारांनी अजितदादांना ठणकावून सांगितले.

# सेवा विकास बँकेचे माजी अध्यक्ष अमर मूलचंदानी यांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अंमलबजावणी संचालनालयाने पुणे



जिल्ह्यातील राजकीय नेत्यास अटक केली आहे. 429 कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणात ही अटक झाली आहे. सेवा विकास बँकेचे माजी अध्यक्ष असलेल्या अमर मूलचंदानी यांच्यावर ही कारवाई झाली आहे. ईडीने न्यायालयात त्यांना हजर केले. न्यायालयाने ७ जुलैपर्यंत त्यांना कोठडी दिली आहे. सेवा विकास बँकेच्या घोटाळ्याची तक्रार अंमलबजावणी संचालनालयाकडे गेली होती. त्यानंतर ईडीने या प्रकरणाचा तपास सुरु केला.

सेवा विकास बँकेचे माजी चेअरमन अमर मूलचंदानी २०१६ मध्ये काँग्रेसमधून भाजपमध्ये आले होते. मूलचंदानी यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्जाचे वाटप केल्याचा आरोप आहे. हे प्रकरण सुमारे ४२९ कोटी रुपयांचे आहे. मूलचंदानी यांनी जवळच्या व्यक्तींना बँकेकडून कर्ज वाटप करुन आर्थिक घोटाळा केला. या प्रकरणात ईडीने त्यांच्याकडे २७ जानेवारी २०२३ रोजी ईडीने छापेमारी केली होती. या प्रकरणात यापूर्वी त्यांना अटक झाली. परंतु जामिनावर ते बाहेर आले.

मूलचंदानी यांनी केलेल्या घोटाळ्यासंदर्भात ऑगस्ट २०२१ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. त्यांच्यांवर सेवा विकास सहकारी बँकेत कर्जासाठी १२४ बनावट प्रस्ताव तयार केले. त्यामाध्यमातून ४२९ कोटी रुपये विविध व्यक्ती व संस्थांना वितरित केले. कोणतीही कागदपत्रे न तपासता त्यांनी कर्जाचे वाटप केले. त्या व्यक्तींची परतफेडीची क्षमता नसतानाही कर्ज दिले गेले. गुन्हा दाखल झाल्यानंतर अंमलबजावणी संचालनालयाने या प्रकरणाचा तपास सुरु केला.


सहकार सहआयुक्त राजेश जाधवर यांनी २०२० मध्ये या बँकेचे ऑडिट केले होते. त्या लेखा परिश्रणातून हा प्रकार उघड झाला. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर अमर मलचंदानी, अशोक मुलचंदानी, मनोहर मूलचंदानी, दया मूलचंदानी, साधना मूलचंदानी व सागर मूलचंदानी अशा सहा जणांना अटक करण्यात आली होती. ईडी मूलचंदानी, रोजरी एजुकेशन ग्रुपचे निर्देशक विनय आरहाना, सागर सूर्यवंशी, खेमचंद भोजवानी आणि त्यांच्या परिवाराची 121 कोटींची संपत्ती जप्त केली आहे.

### चर्चेतली बातमी

# महाराष्ट्राच्या जवानाला सिक्कीममध्ये वीरमरण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातून एक दुःखद बातमी समोर आली आहे.




शिरपूर तालुक्यातील वाघाडी गावचे रहिवासी तथा भारतीय लष्करातील लान्स नायक मनोज संजय माळी यांना वीरमरण आले आहे. वयाच्या अवघ्या २५व्या वर्षी संजय माळी यांना सिक्कीम येथे कर्तव्य बजावत असताना वीरमरण आले. या घटनेची माहिती वाघाडी गावात येताच माळी कुंटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला अन् गावावर शोककळा पसरली.

याबाबत मिळालेल्या माहिती नुसार २४ मार्च २०१९ ला भारतीय लष्करात भरती झालेले मनोज संजय माळी हे लान्स नायक या पदावर कार्यरत होते. त्यांची सिक्कीम येथे नियुक्ती करण्यात आली होती. आज पहाटे सिक्कीम येथे लान्स नायक मनोज संजय माळी हे उंच डोंगराळ प्रदेशात कर्तव्य बजावत असताना त्यांचा अचानक पाय घसरला. आणि ते थेट ५०० ते ६०० फूट खोल दरीत कोसळले. या घटनेत जबर जखमी होवून त्यांचा जागीच मृत्यू झाला. सोबतच्या लष्कराकडून त्वरीत शोध सुरू करण्यात आला. आज दुपारी साडे बारा वाजेच्या सुमारास लान्स नायक मनोज माळी यांचा मृतदेह शोध पथकास मिळून आला. यानंतर सिक्कीम येथील लष्कराच्या रुग्णालयात त्यांचा मृतदेह नेण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, या घटनेची माहिती आज दुपारी वाघाडी ( ता. शिरपूर जि.धुळे ) येथे कुटुंबीयांना कळवण्यात आली. तरुण मुलाच्या मृत्यूने माळी कुटुंबीयांवर दुःखाचा अक्षरशः डोंगर कोसळला. हे वृत्त गावात वाऱ्यासारखे पसरले आणि अवघे गाव माळी कुटुंबीयांना धीर देण्यासाठी एकत्र आले. शहिद जवान मनोज माळी यांच्या पश्चात वडील संजय बुधा माळी, भाऊ चेतन आणि आई सुरेखा माळी हे तिघे जण आहेत. वडील गावातच शेती करतात. लान्स नायक मनोज माळी यांचं पार्थिव उद्या वाघाडी गावात आणले जाणार असल्याची प्राथमिक गावकऱ्यांनी दिली आहे.











विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

जगताना स्वतःसाठी काहीतरी जपून ठेव.'' प्रत्येकानं आपापल्या वाट्याचं शेत नांगरून ठेवायचं असतं. पाऊस पडेल किंवा नाही याची चिंता करायची नसते.' ही वाक्यं कुठेतरी गीतेतल्या उपदेशाशी नातं सांगणारी आहेत असं मला वाटतं. आपलं कर्तव्य आपण प्रामाणिकपणे करावं. बाकी गोष्टी आपल्या हातात नसतात. पुढचं ईश्वरावर सोपवावं असंच गीतेत सांगितलं आहे ना !
एकंदरीत हे नाटक आपल्याला थेट विठ्ठलाशी जोडणारा सांगीतिक अनुभव देतं. या नाटकात एकाच रंगमंचावर जणू देहू नगरी अवतरली आहे. तुकारामबुवांचा वाडा, आवलीच स्वयंपाकघर, भंडाऱ्याचा डोंगर, इंद्रायणीचा घाट हे सगळे दाखवण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे. यात प्रकाश योजना, नेपथ्य या साऱ्यांचा भाग आहेच. आवली किंवा रुख्मिणी कपडे धुताना, इंद्रायणीच्या पाण्यात हात घातल्यानंतर होणारा आवाज इतका हुबेहूब आहे की खरोखरच इंद्रायणी नदी तिथे असल्याचा भास होतो. यात पारंपरिक संगीत वाद्यांचा वापर केला आहे. तबला, पखवाज, संवादिनी, सतार आदी वाद्यांचे स्वर मन प्रसन्न करणारे आहेत. प्राजक्त देशमुख यांचे संवाद आणि अभंगरचना यांना शुभांगी सदावर्ते ( आवली ) आणि मानसी जोशी ( रुख्मिणी /लखुबाई ) यांनी न्याय दिला आहे असे म्हणण्यापेक्षा त्याचे सोने केले आहे असे म्हणणे योग्य ठरेल. आनंद भाटे यांचे तुकाराम महाराजांच्या अभंगांचे पार्श्वगायन भक्तिरसाचा अनुभव देणारे आहे.
शुभांगी सदावर्ते आणि मानसी जोशी यांचा जिवंत अभिनय हे नाटकाचं वैशिष्ट्य. आवली जेव्हा तुकारामांना साद घालते तेव्हा तिचे, ' आवो आवो ' हे शब्द अक्षरशः काळजाचं पाणी पाणी करतात एवढी ताकद, एवढी आर्तता त्या स्वरात आहे. मानसी जोशी विठ्ठलाच्या मूर्तीशी संवाद करीत असताना ती केवळ मूर्तीशी बोलते आहे असे वाटतच नाही. प्रत्यक्ष विठ्ठलच समोर आहे असे वाटते. तुकाराम बुवांची गाथा वाचताना आवली आणि रुख्मिणी दाखवल्या आहेत. आवलीचे गूढ रम्य स्वप्न, वाऱ्याने उडणारी तुकोबांच्या गाथेची पाने, इंद्रायणीत पडून वाहून जाणारी गाथेची पाने हे सगळे प्रसंग कमालीचे जिवंत वाटतात.




संगीत देवबाभळी



# आनंदी पहाट

## जगणे समजले तरच सुख कळते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सुख हे भोगण्यापेक्षा समजण्यात अधिक" असते, ह्याची जाणीव सतत असणे जरुरीचे असते. अर्धा ग्लास रिकामा असल्याचे दुःख करत बसण्यापेक्षा अर्धा ग्लास भरलेला असल्याचे सुख का मानू नये ? प्रत्येकाची सुखाची व्याख्या निराळी असते. अर्थातच ती ज्याच्या त्याच्या अनुभूतीवर ठरत असते. कोण कशात सुख शोधेल ते सांगता येत नाही, समजूही शकत नाही. सुख म्हणजे नक्की काय असते ? हे ज्याने त्याने अनुभवल्या शिवाय कळू शकत नाही.

लहान सहान गोष्टीतही सुख, शोधले तर सापडते. सुख म्हणजे काय असते तसे बघितले तर आपण दैनंदिन जीवनांत नेहमीच अनुभवत असतो. जसे खूप दिवसापासून हरवलेली एखादी अत्यंत आवडीची वस्तू अचानक सापडते तेंव्हा, ट्रॅफिक जॅममध्ये आपण फसलेले असतो तेव्हा शेजारच्या गाडीतले लहान मूल आपल्याकडे बघून गोड हसते तेंव्हा, आकाशात पूर्ण गोल चंद्र दिसतो तेंव्हा जे काही अंतर्मनाला होते ना त्यांतही अनोखे सुख सामावलेले असते. म्हणजेच सुख एखाद्या वास्तुसारखे दिसत नसले तरीही आपल्याला मिळालेल्या सुखाची अनुभूती आपल्या चेहेऱ्यावर दिसू लागते. कमी अधिक प्रमाणात सर्वांच्याच वाटेला कष्ट, दुःख येत असतात, परंतू त्यावेळी मन प्रसन्न, आनंदी ठेवले कि सुख आपोआप आपल्याला शोधत येते. मन प्रसन्न आणि आनंदी ठेवण्यासाठी दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचाराने करण्याची जरुरी असल्याचे आपण समजून घेतले पाहिजे. आपल्यापैकी प्रत्येकाची सुख आणि समाधान मिळवायची धडपड सदोदित सुरु असते. खरे तर सुख आणि समाधान ह्या दोन्ही इतकीच शांती महत्वाची असते. सुख शरीरासाठी, समाधान मनासाठी आणि शांती मात्र अंतरात्म्यासाठी मिळवायची असते. अनेकदा आपल्याकडून आपल्याच अंतरात्म्याच्या शांतीची आपल्याला जाणीव होत नाही, त्याचा विचारही मनाला स्पर्श करत नाही.



आधुनिक केसरी

**ठायीच चैतन्य | देखिले गा ||**

चोरी झाली घरा | चैन नाही मनी ||
धुंडे त्रिभुवनी | गवसेना ||१||
काय करू सांगा | दिवाळे निघाले ||
सारे दुरावले | गणगोत ||२||
देहाच्या घराला | विकारी कवाडे ||
आत आत्मा कुढे | मौल्यवान ||३||
आनंदला जीव | भेटे तुका वानी ||
एकांताचा धनी | धन्य झालो ||४||
सापडला चोर | चंद्रभागे तीरी ||
उभा विटेवरी | आत्मा चोर ||५||
आनंदले मन | होता दिव्य भेट ||
नको दावू वाट | घराची त्या ||६||
आत्मा-परमात्मा | अद्वैत लावण्य ||
ठायीच चैतन्य | देखिले गा ||७||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

प्रतिकूलं ह्यभक्तेभ्यो वचनं
तव मातृके | अभीष्टफललाभाय
दुर्गां देवीं नमाम्यहम् || ३७ ||
अभक्तांसाठी तुझे वचन प्रतिकूल असते.
अशा तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या
प्राप्तीसाठी नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

उक्त सदा अस्मरण है, दृढ़ राखहु विशवास ।
भजन करो प्रभु शरण में, जग से रहो उदास ।।३२।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/३२
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
काळाचे सदैव स्मरण ठेवत,
प्रभू -भक्तीत दृढ विश्वास ठेऊन या जगापासून वैराग्य घेत परमेश्वराची उपासना करावी.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# स्थूलपंचमहाभूते

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

त्याच्यावर जर स्फटिक पडला तर तो अगदी कापसासारखा दिसतो. पण त्याच्यावर जर डोके आपटले तर ते फुटते. नुसत्या कापसावर डोके आपटले तर ते फुटत नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. आम्हा महिलांना तर एक ऊदा. नेहमीच्या परिचयाचे आहे. आपण तांदूळ निवडतो, त्यात पांढरे खडे असतात. त्याचा आकार पण तांदळाच्या आकारासारखा असतो. पण जेवणात ते आले तर दात पडतात, आणि स्वयंपाक करणारीची कसोटी लागते. तिला आता कळते तांदळा सारखा दिसणारा तो खडा आहे. सोने आणि पितळ जरी एकसारखे दिसत असले तरी पितळ तापवले तर काळे पडते सोने काळे पडत नाही. असे अनेक ऊदाहरणे देऊन आकाश व परब्रम्ह सारखे कसे नाहीत हे समजते. आकाश पंचमहाभूतापैकी एक आहे ते मायेतून निर्माण होते, मायेच्या पलीकडे असणारे अनंत ब्रम्ह आणि मायेच्या अलीकडे असणारे आकाश दोन्ही एकच असत नाहीत. 50 ते 56 ओव्यातून गुरू शिष्य संवाद काय झाला ते आता आपण पाहूया. आकाश निळ्या रंगाचे आहे. आणि रंग असणे हे इंद्रियांवर अवलंबून असते. तर ब्रम्हवस्तु अतींद्रिय आहे. तिच्या ठिकाणी शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध नाहीत. म्हणजेच ती निर्गुण निराकार आहे. आकाश तर ब्रम्हाशी एकरूप झालेले आहे. 5 भूतांपैकी 4 भूतांचा नाश होत असतो. पण आकाशाचा नाश कधीही होत नाही. रंग नाही व्यक्त आकार नाही कोणताही विकार नाही आकाश अचल आहे.

# देह हा देवाच्या प्राप्तीकरता आहे

आधुनिक केसरी

एकदा असे झाले, की एका साधूकडे चोरांनी चोरी केली. ते पळून जात असताना शिष्यांनी पाहिले, तेव्हा चोरांना धरून त्या शिष्यांनी खूप चोप दिला. हे त्यांचे करणे गुरूला समजले, तेव्हा त्या चोरांना आणून, गुरूने त्यांच्या अंगाला तेल वगैरे लावून स्नान घातले, आणि त्यांना पंचपक्वान्नांचे भोजन दिले. ' हे असे काय करता ? ' म्हणून शिष्यांनी गुरूला विचारले, तेव्हा त्याने शिष्यांना सांगितले की, " तुम्ही तरी काय करता ? सर्वचजण देवाच्या घरी चोरी करीत आहेत; कारण आपल्याला त्याने हा जो देह दिला तो देवाची प्राप्ती करून घेण्यासाठी म्हणून दिला, परंतु आपण ते न करता त्याच्यापासून विषय चोरतो आहोच की नाही ! म्हणून, विषयात आसक्ती न ठेवता आपण मनापासून देवाची भक्ती करावी. " आपण सर्वांनी ' मी भगवंताकरिता आहे ' असे मनाने समजावे. सर्व ठिकाणी भगवंतच भरलेला आहे अशी मनाची पक्की खात्री झाल्यावर, मग द्वैत आपोआप नाहीसे होऊन जी एकाग्रता साधते, तीच खरी



समाधी होय.संत काय करतात ? आपण चुकीची वाट चालत असताना, ' अरे, तू वाट चुकलास ' अशी जागृती आपल्याला देतात आणि खरा मार्ग दाखवितात. ते सदासर्वदा समाधिसुख भोगीत असतात, आणि नेहमी भगवंताविषयीच सांगत असतात. भगवंताच्या लीला पाहणाऱ्यांनाच खरा आनंद मिळतो. आपण एक दाणा शेतात पेरावा आणि त्याबद्दल हजार दाणे घ्यावे, ही भगवंताची लीला आहे. भगवंताच्या ठिकाणी जे जे आहे ते ते सर्व आपल्या ठिकाणी आहे. जसा मारुतीमध्ये देव-अंश होता, तसा तो आपल्यामध्येही आहे; त्याने तो फुलविला, आपण तो झाकून विझवून टाकला. मारुतीचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवावे. त्याचे ब्रह्मचर्य, भक्ती, दास्य आणि परोपकार करण्याची तऱ्हा या गोष्टी आपण शिकाव्यात. मारुती हा चिरंजीव आहे. ज्याची तशी भावना असेल त्याला अजूनही त्याचे दर्शन होईल. मारुतीला सर्व सृष्टी रामरूप दिसली. हेच खरे भक्तीचे फळ आहे. उपासक देहाला विसरला की उपास्यमूर्तीमध्ये त्याला जिवंतपणा अनुभवाला येऊ लागेल. ' माझ्या देवाला हे आवडेल का ? ' अशा भावनेने जगात वागावे. हाच सगुणोपासनेचा मुख्य हेतू आहे. भगवंत दाता आहे, तो माझ्या मागे आहे, तो माझे कल्याण करणारा आहे, ही जाणीव झाली की, जे मिळाले ते भगवंताच्या इच्छेने मिळाले ही भावना होऊन, आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मिळेल. समाधान आणि आनंद हीच खरी लक्ष्मी होय. आपली वृत्ती अशी असावी की, कुणाला आनंद पाहिजे असेल तर त्याने आपल्याकडे धाव घ्यावी. इतर संपत्ती कितीही दिली तरी पुरी पडत नाही, पण वृत्तीचा आनंद देऊन कधीच संपत नाही.

**आजचे बोधवचन आहे- वृत्तीचे समाधान ही भगवंताच्या कृपेची खूण आहे.**

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

ज्ञानोबामाउली निवृत्तीनाथांचे शिष्य होते. अशी अगणित उदाहरणे आहेत. ज्ञानेश्वर, रामदास स्वामी सारखे सिद्ध अवतार झाले. पण त्याना देखील गुरू करावा लागला तर साक्षात दत्तगुरूंना तपस्येच्या काळात २४ जीव भेटले. त्यातल्या प्रत्येकात त्यांना काही गुण दिसला काहीतरी शिकण्यासारख दिसलं म्हणून त्यांनी ह्या २४ जीवांना गुरु मानले. दिक्षा गुरु एकच असतो पण शिक्षा गुरु अनेक असू शकतात. श्री अनुसया नंदन दतात्रेयांनी खालील २४ जणांना शिक्षा गुरु मानले आहे व त्या प्रत्येका बद्दल ते काय म्हणतात ते थोडक्यात असे.
(१) पृथ्वी :- पुष्कळ सहन करून सर्वांनाच सुख देणे ,सर्वांप्रती सदभाव व सहनशीलता शिकलो (२) वायू :- असंतोष व निसंगता शिकलो, (३) आकाश :- आत्मा आकाशा सारखा अनादी आणि अविनाशी आहे ईश्वर त्याच्या सारखा सर्व व्यापी आहे हे शिकलो

क्रमशः

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

चलत्येकेन पादेन तिष्ठत्यन्येन पण्डितः ।नासमीक्ष्य परं स्थानं पूर्वमायतनं त्यजेत् ।।सरलार्थ - शहाणा माणूस एक पाऊल पुढे टाकतो आणि दुसरे पाऊल टाकायच्या आधी विचार करतो. (याचा अर्थ कोणीही) पुढच्या स्थानाची पूर्ण तपासणी केल्यावाचून पूर्वीचे स्थान सोडू नये. स्पष्टीकरण : जे दुसरे ठिकाण किंवा जो दुसरा व्यवसाय आपण स्वीकारणार आहोत, ते स्थान किंवा तो व्यवसाय आपल्याला अनुकूल आहे का प्रतिकूल आहे, त्याची पूर्ण चौकशी केल्यावाचून पहिल्या स्थानाचा किंवा व्यवसायाचा त्याग करणे इष्ट नव्हे. नाही तर हेही नाही अन् तेही नाही अशी अवस्था व्हायची.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



वाढते अपघात; नियमांचे पालन करा
पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, ७ जुलै २०२३



भ्रष्ट नेत्यांना सामावून घेणारा आणि मंत्रीपद देणारा पक्ष म्हणजे....
पान ७


# भ्रष्टाचार भाजपाच्या रक्तातच : नाना पटोले

## ईडी, सीबीआयची भीती दाखवून पक्ष फोडणाऱ्या हुकूमशाही प्रवृत्तीचा एकजुटीने मुकाबला करू

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाला पराभवाची भिती सतावू लागल्याने दडपशाहीच्या मार्गाने पक्ष फोडले जात आहेत. महाराष्ट्रात मागील काही दिवसापासून घाणरेडे राजकारण सुरु आहे. ईडी, सीबीआय या सरकारी यंत्रणाची भिती दाखवून विरोधी पक्ष संपवण्याचे गलिच्छ राजकारण सुरु असून लोकशाहीचा गळा घोटला जात आहे. भाजपाच्या या हुकुमशाही प्रवृत्तीला संपवण्याचा संकल्प करण्यात आला आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली गरवारे क्लब हाऊस येथे पार पडली. या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, तेलंगाणाचे प्रभारी माणिकराव ठाकरे, प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, बस्वराज पाटील, आ. प्रणिती शिंदे विधान परिषदेतील गटनेते व माजी मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील बैठकीला उपस्थित होते. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भाजपाच्या सत्तापिपासू राजकारणावर आजच्या बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. या प्रवृत्तीचा सर्वजणांनी एकत्रिपणे लढा देण्यावर चर्चा करण्यात आली. पंतप्रधान मोदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे जाहीरपणे आरोप करतात आणि त्यांनाच सन्मानाने सरकारमध्ये सामावून घेत मंत्रीपदे देतात. भ्रष्टाचाराबद्दल पंतप्रधान मोदींचे खायचे दात व दाखवायचे दात वेगळे आहेत. नॅशनलिस्ट करप्ट पार्टी म्हणता व त्यांनाच सत्तेत सोबत कसे घेता ? नरेंद्र मोदी व भाजपा भ्रष्टाचाऱ्यांना संरक्षण देत आहेत. भ्रष्टाचाराविरोधातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषा ही केवळ पोकळ गर्जना आहे. भ्रष्टाचार हा भाजपच्या रक्तात भिणलेला आहे. कर्नाटकमध्ये ४० टक्के कमिशनचे भाजपा सरकार होते व त्याच भ्रष्टाचारी लोकांचा पंतप्रधान प्रचार करत होते. भ्रष्टाचारी लोकांना पक्षात घेऊन भाजपा पक्षाची ताकद वाढवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे. भाजपाचा हा प्रकार लोकशाहीसाठी घातक आहे. समृद्धी महामार्गावर बस अपघातात २६ लोक होरपळून मेले त्यांचा अंत्यविधी होत असताना राजभवनात मंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याचा जयघोष करताना भाजपाच्या लोकांना जराही लाज वाटली नाही.

यावेळी बोलताना विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून काही लोक गेले असले तरी त्याचा आमच्या आघाडीवर काहीही परिणाम झालेला नाही उलट आघाडी आणखी बळकट झाली आहे . विधानसभेत आम्ही सर्वजण एकत्रितपणे आणखी चांगले काम करु . पण राज्यात जे राजकारण सुरु आहे ते मात्र महाराष्ट्राच्या जनतेला आवडलेले नाही . जनता भाजपाच्या या राजकारणाला आगामी निवडणुकीत धडा शिकवेल .

भाजपा सरकार जनतेच्या प्रश्नावर बोलत नाही, शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे आहे, महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे. भाजपाचे केंद्रातील व राज्यातील सरकार सर्व आघाड्यांवर अपयशी ठरले आहे. काँग्रेस पक्ष जनतेचे प्रश्न घेऊन राज्यातील जिल्ह्या-जिल्ह्यात विविध आंदोलने करणार आहे तसेच पत्रकार परिषदा घेऊन भाजपाचा खरा चेहरा उघडा करणार आहे.



भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना जयंतीनिमित्त भाजपा प्रदेश कार्यालयात गुरुवारी अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, मुख्यालय सहप्रभारी सुमंत घैसास, ज्येष्ठ नेते सुनील कर्जतकर, प्रदेश कार्यालय सहसचिव भरत राऊत, सदाशिव चौधरी आदी उपस्थित होते.

# तिस्ता सेटलवाड यांना न्यायालयाचा दिलासा

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड यांचा अंतरिम जामीन १९ जुलैपर्यंत वाढवला असून यासंदर्भात गुजरात सरकारला नोटीस बजावण्यात आली आहे. तिस्ता यांच्यावर २००२ च्या गुजरात दंगलीदरम्यान बनावट पुराव्यांचे आधारे निरपराध व्यक्तींना आरोपांमध्ये गोवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. गुजरात उच्च न्यायालयाच्या आदेशाला तिस्ता सेटलवाड यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यावर न्यायालयाने गुजरात सरकारला नोटीस बजावली आणि दोन्ही पक्षांना संबंधित कागदपत्रे १५ जुलैपर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले. त्यावर अतिरिक्त महान्यायअभिकर्ता एस व्ही राजू यांनी कागदपत्रांचे भाषांतर करण्यासाठी थोडा वेळ मागितला. त्यानंतर न्यायालयाने पुढील सुनावणी १९ जुलैला होईल असे सांगितले. यापूर्वी तिस्ता सेटलवाड यांनी गुजरात उच्च न्यायालयात जामीन अर्ज केला होता. न्यायालयाने तो फेटाळला आणि त्यांना तातडीने शरण येण्यास सांगितले. त्यानंतर सेटलवाड यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि त्याच दिवशी म्हणजे १ जुलैला सर्वोच्च न्यायालयाने गुजरात उच्च न्यायालयाच्या आदेशाला एक आठवडयासाठी स्थगिती दिली.

# भाजपसोबत जाणे चुकीचे ठरले: बच्चू कडू

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामील झाल्यामुळे एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेल्या आमदारांमध्ये साहजिकच नाराजी राहणार आहे. आपण राष्ट्रवादीला कंटाळून भाजपकडे गेलो होतो, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आम्हाला काम करू देत नाही, असाच सूर होता. आता भाजपने राष्ट्रवादीला जवळ केल्याने भाजपला साथ देणे चुकीचे ठरल्याची भावना या आमदारांची झाली आहे, अशा शब्दांत प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांनी आपली नाराजी व्यक्ती केली आहे. नव्या घडामोडींमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंबा देणाऱ्या ४० आमदारांची मोठी गोची झाली आहे. या आमदारांची दोन्ही बाजूने कोंडी झाली आहे. वर्षभरापूर्वी राष्ट्रवादीला कंटाळून आपण भाजपला पाठिंबा दिला होता. आता अजित पवार हे पुन्हा निधी खेचून घेतील, आमच्या निर्णयात आडवे येतील, अशी भीती आहे. त्यामुळे या आमदारांसमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# जिंतूर येथे आमदार मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते विविध कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**बी.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरालगत असणाऱ्या हुतात्मा स्मारक मुख्य रस्ता ते औंढा महामार्ग, जुनी पुंगळवेस, वरुड रोड, सचिन डिपार्टमेंटल स्टोअर आदी रस्त्याचे भूमिपूजन 4 जुलै 2023 रोजी जिंतूरच्या आमदार मेघनादी साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते पार पडले.

जिंतूर शहर अगदी झपाट्याने वाढत आहे. मागील वीस - पंचवीस वर्षापासून या रस्त्याची मागणी या भागातील नागरिक वेळोवेळी करत आलेले आहेत. या भागात विविध महाविद्यालय, शाळा, रुग्णालय, वसतिगृहे आहेत. हा रस्ता जुन्या जिंतूरला जोडला जाणारा एक प्रमुख रस्ता आहे. हा रस्ता विकसित झाल्याने जिंतूर शहरात प्रवेश करण्यासाठी एक बायपास तयार होईल; त्यामुळे लोकांना मुख्य रस्त्यावरून न जाता जिंतूर शहरात येण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी हा रस्ता उपयुक्त ठरेल. या भागातून जिंतूरच्या बाहेर जाणारा मजूर वर्ग शेतकरी वर्ग ये- जा करत असतो. शेतातील माल जिंतूर बाजारपेठेत आणण्यासाठी सुद्धा या रस्त्याचा खूप उपयोग होणार आहे. जिंतूर शहरालगत असणारी औद्योगिक वसाहत यांना सुद्धा या रस्त्याचा उपयोग होणार आहे. या भागात विविध मंगल कार्यालय, फंक्शन हॉल आहेत शहरातील बहुतांश कार्यक्रम याच भागामध्ये होतात.

शहरातीलच नव्हे तर जिंतूर तालुक्यातील लोकांना या रस्त्यात ची खूप दिवसापासून ओढ होती तसेच यावेळी शहरातील नरसिंह चौक वरुड रोड व सचिन डिपार्टमेंट आधी रस्त्यांचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाळू बुधवंत, डॉ. पंडित दराडे ( भाजप विधानसभा प्रमुख जिंतूर ) माजी नगरसेवक ॲड.गोपाळ रोकडे, विक्की बोर्डीकर, विलास भंडारे, गणेश कुरे, मोहम्मद हकीम भाई , सुमेध सूर्यवंशी, बंटी जाधव, गणेश दराडे, सुमनताई बार्शीकर, निर्मला बांडे आदींनी मेहनत घेतली .




# गडकरींचा दावा

आधुनिक केसरी

पेट्रोलच्या किंमती १०० रुपये लिटरच्या पुढे गेल्या आहेत. देशातल्या मुख्य शहरांमध्ये पेट्रोल प्रति लिटर १०४ ते १०७ रुपये प्रति लिटर आहे. अशात नितीन गडकरी यांनी देशात पेट्रोलची किंमत १५ रुपये प्रति लिटर होऊ शकते असा दावा केला आहे. राजस्थानमधल्ये कार्यक्रमात जनतेला संबोधित करत असताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे जे चांगलेच चर्चेत आहे. ६० टक्के इथेनॉल आणि ४० टक्के वीज वापरली गेली तर पेट्रोलची किंमत १५ रुपये लिटरपर्यंत कमी होऊ शकते. त्यामुळे देशातील इंधनाची आयातही कमी होईल आणि पैसा सरकारकडे जाईल. हा निधी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वापरता येऊ शकतो. शेतकरी हा आपल्या देशाचा फक्त अन्नदाताच नाही तर उर्जादाताही होईल. ऑगस्ट महिन्यात टोयोटा कंपनीची वाहने लाँच करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांनी तयार केलेल्या इथेनॉलवर ही वाहने चालतील. ६० टक्के इथेनॉल आणि ४० टक्के वीज, त्याची सरासरी पकडली तर पेट्रोलची किंमत १५ रुपये प्रति लिटर होईल. नितीन गडकरींनी राजस्थानातील प्रतापगढ या ठिकाणी ५ हजार ६०० कोटी रुपयांच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या बांधकामाचे उद्घाटन केले. याच कार्यक्रमात त्यांनी जनतेला संबोधित केले. भारतात इंधनाची आयात १६ लाख कोटी रुपयांची आहे. ही आयात कमी केल्यास हा पैसा परदेशात जाण्याऐवजी शेतकऱ्यांच्या घरी जाईल. उसापासून इथेनॉलची निर्मिती केली जाते आणि भारतात लाखो ऊस उत्पादक शेतकरी आहेत, ज्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन हे आहे. त्यामुळे असे झाल्यास शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल असंही गडकरी यांनी म्हटले आहे.

# मतदार राजा, जागा हो... धोकेबाजांना धडा शिकव!



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**काल, आज आणि यापूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात सत्तेसाठी जो अनैतिक धुमाकूळ चाललेला आहे. तो पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारा आहे. मतदार राजाला शरमेनं मान खाली घालायला लावणारा, संस्कृतीची मोडतोड करणारा आहे. मानवतेची होळी करणारा आहे. त्याचबरोबर तरुणांना संस्कारहीन, आणि वाईट मार्गाला लावणारा आहे. त्याचे पडसाद महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उमटताना दिसतात. त्यामुळेच समाजाचे स्वास्थ्य बिघडत चालले आहे. या समाजाचे स्वास्थ्य बिघडविण्याचे काम या देशातील सध्याची राजकारणी मंडळी करताना दिसत आहे. मतदार राजाही षंढ झाल्यासारखा शांत आहे. त्याची किंमत गाढवापेक्षाही कमी राजकारण्यांनी करुन टाकली आहे.  गाढवाला बाजारात भाव आहे पण मतदार राजाला भाव नाही.**

मतदार राजाला सारे फुकट असावे वाटते. दारू, बाटली,मटन पार्टी वर किंवा हजार पाचशे रूपयांवर तो सर्रास विकला जाऊ लागला आहे.अनेक खोट्या आश्वासनांना व आमिषाला बळी पडून तो लाचार, भ्रष्टाचारी बनला आहे. सुशिक्षितही गपचूप आहेत. अनैतिक राजकारण्यांचे उंबरठे झिजवताना आणि तळवे चाटताना दिसत आहेत. त्यामुळे स्वतःचं अस्तित्व गमावून बसले आहेत. याचाच परिणाम लोकप्रतिनिधी वाटेल तिकडे तोंड खूपसु लागले आहेत. त्यांची सगळ्याच क्षेत्रात मनमानी चालू आहे. मतदार राजाला ते गृहीत धरून मतदार राजाचीच वाट लावत आहेत. म्हणून आत्ता तरी मतदार राजा जागा झाला पाहिजे आणि त्यांनी लोकप्रतिनिधींना आपली जागा दाखवून दिली पाहिजे.

आज राजकारणात जे काही घडत आहे ते पाहून सामान्य माणूस हतबल झाला आहे. राजकारणात सत्तेसाठी लोकप्रतिनिधी जे काही वागतात, बोलतात, लाचार होतात,पक्ष बदलतात अन् लोकशाहीची पायमल्ली करतात हे फार वाईट आहे.त्यामुळे सामान्य माणसांचे जगणे,फिरणे,राहणे मुश्किल झाले आहे. तो रोज जीव मुठीत घेऊन जगतो आहे. पक्ष बदलताना मतदाराचा,विचारधारेचा ते काडीचाही विचार करताना दिसत नाहीत. त्यांच्या या अशा दल बदलू पक्ष बदलू भूमिकेमुळे मतदार राजा, कार्यकर्ते व काही आमदारही अडचणीत येताना दिसतात. कुणाबरोबर जावे हे कळेनासे होते. मतदारांनी ज्या पक्षाला, विचारधारेला बघून लोकप्रतिनिधींना मतदान केलेले असते त्या मतदारांचा, कार्यकर्त्यांचा विचार न करता विचार न घेता त्यांची माती करून टाकताना दिसतात. म्हणजे असे नितीहीन,संस्कारहीन आणि भूमिकाहीन लोकप्रतिनिधी जनतेची काय सेवा करणार ?

हा प्रश्न सर्वांनाच सतावत राहतो.तेही म्हणजे लोकप्रतिनिधीही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा फुटबॉल प्रमाणे इतरांना वापर करू देतात हेच वाईट आहे. खरे तर मतदारांना व सर्व सामान्य लोकांनाही वाईटाला चांगलं आणि चांगल्याला वाईट म्हणण्याची सवय लागलेली दिसते आहे. आज समाजात जिकडे तिकडे वाईट कृत्य करणाऱ्यांनाच मोठे मानलं जातं त्यांना मोठेपण दिले जातं.हे खरे तर मतदारांना आणि सर्वसामान्यांना कळायला हवे. राजकारण्यांनी महाराष्ट्रात हिंदुत्व हिंदुत्व करून जातीय, धर्मिय तेढ निर्माण केल्यामुळे आणि सतत करत असल्यामळे सामान्य माणुस भयभीत झाला आहे. रोज हेच लोकप्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन त्यांच्या विचारांची पायमल्ली करून जनतेची, सामान्य माणसांची फसवणूक आणि दिशाभूल करत आहेत. हे भयानक वास्तव समाजात दिसत आहे. चांगला विचारशील, बुद्धीवादी, मानवतावादी माणुस भयभीत झाला असून गुन्हेगारी क्षेत्रातील माणसं उथळ माथ्याने फिरत आहेत. त्यांनाच बदाम काजू सारखा भाव आला आहे.रोज खुन, मारामाऱ्या, बलात्कार, होताना दिसत आहेत.उघड उडड शस्त्रे घेऊन रस्त्या रस्त्यावर दहशत माजवली जात आहे. अनेकांचे जीव नाहक घेतले जात आहेत. त्यांची कुठेच मोजदाद नाही. अधिकाऱ्याकडूनही प्रचंड नोकर दाराचे शोषण चालू आहे. अधिकारी भ्रष्टाचारात गुंतले आहेत. त्यांची सरकारकडे तक्रार केली तरीही दखल घेतली जात नाही उलट त्याची पाठ राखण केली जाते. त्यांना क्लीन चीट दिली जाते. कुठल्याही अधिकाऱ्यांवर सरकारचा वचक नाही. अधिकाऱ्याकडून सामान्याच्या तक्रारीची दखल नाही. त्यामुळे तेही या भ्रष्टाचारांच्या सागरात पोहून आणि तरुण निघत आहेत. कारण ज्यांना आम्ही निवडून दिले आहे तेच लोकप्रतिनिधी आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी,  सत्तेसाठी लाचार बनत आहेत. स्वतःची संपत्ती शाबूत ठेवण्यासाठी सर्वसामान्य माणसांच्या मुंड्या मोडत आहेत. न्यायालयाकडूनही न्याय मिळताना दिसत नाही. ज्या शेतकरी,मतदारांनी, सुशिक्षित बेरोजगारांनी, खेड्यापाड्यातील  गरिबांनी, शेतमजुरांनी, दलित,आदिवासी ,ओबीसी, भटक्या विमुक्तांनी, नोकरदारांनी लोकप्रतिनिधींना म्हणजेच आमदार,खासदारांना मत देऊन निवडून आणले आहे. त्या आमदार, खासदार लोकप्रतिनिधीकडून या सर्व जनतेच्या विविध भावना आहेत. त्यांचे विविध प्रश्न आहेत. त्यांच्या विविध जीवघेण्या समस्या आहेत. त्या सर्वांच्या स्वप्नांवर नांगर फिरवण्याचे काम हीच मंडळी करताना दिसत आहे. कोणाचेही प्रश्न सोडवण्यामध्ये शासनाला म्हणजे लोकप्रतिनिधींना रस नाही. उलट या जनतेला भावनिक बनवून आपल्याकडे खेचून शब्दांच्या मोहजाळ्यात अडकवून त्यांचे जीवन कसे बेचव करता येईल. त्यांना गुलामीत कसे ठेवता येईल हेच प्रतिनिधी करताना दिसत आहेत. लोकप्रतिनिधींची संपत्ती अमाप आहे. भ्रष्टाचार करून मिळवलेली ती संपत्ती आहे. ती संपत्ती सांभाळण्यासाठी ही लोकप्रतिनिधी नावाची दलालं विकली जात आहेत. कुणीकडून कुणाकडेही कोणत्याही पक्षात सैरभैर पळताना दिसत आहेत. पुन्हा वरून नीलाजऱ्यासारखे आम्ही किती इमानी आहोत हे दाखवताना दिसत आहेत.

नीतिहीन लोकप्रतिनिधी शहाणपणाच्या गप्पा मारताना दिसत आहेत. खरे तर जनतेने म्हणजेच मतदार राजाने हे ओळखायला हवे. ज्या मतदार राजाच्या जीवावर निवडून येऊन त्यांच्याच नरडीचा घोट घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. तरीही मतदार राजा मेल्यासारखा गपचूप पडून राहतो. तो बोलत नाही, आवाज उठवत नाही म्हणूनच त्यांचे फावते  आहे. या मतदार राजांनी जातीच्या, धर्माच्या, नातेवाईकाच्या भिंती बाजूला सारून अशा भ्रष्टाचारी, जातीय लोकप्रतिनिधींना आपले करण्याऐवजी त्यांना दळणातल्या खड्यावाणी बाजूला फेकून देऊन इमाने इतबारे जनतेची सेवा करणाऱ्या लोकप्रतिनिधींना निवडून द्यायला हवे.  कोणत्याही जातीय, धर्मीय सरकारच्या छाताडावर पाय देऊन महागाई कमी करायला लावली पाहिजे, खाजगीकरण थांबवायला लावले पाहिजे, नोकर भरती सुरू करायला लावली पाहिजे. शाळांची संख्या वाढवायला पाहिजे. गुणवत्तेचं शिक्षण द्यायला हवे.ते सोडून देऊन मतदार राजाही कुत्र्यासारखा त्यांच्या तुकड्यावर, मटन पार्टीवर जगताना दिसतो आहे. म्हणूनच ही देशातील वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधी देवा, धर्माचे रस्ते दुरुस्त करत आहेत. तिथपर्यंत रेल्वेची व्यवस्था करत आहेत. पण सर्वसामान्य मतदार राजाच्या आरोग्याच्या सोयीसाठी दवाखाने, तरुणांसाठी शाळा, महाविद्यालये बांधताना दिसत नाहीत. महागाई कमी करताना दिसत नाहीत. मंत्रालयात, संसदेत सत्यनारायण करणे, एकाच धर्माची पूजा करून जाती जातीत, धर्मा धर्मात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. आज देशात ज्या जातीय, धर्मीय दंगली उसळत आहेत त्यालाही हे सरकार जबाबदार आहे. गोमूत्र शिंपडून ती जागा पवित्र करण्याचा प्रयत्न करून समाजामध्ये विषमतेचे विष पेरण्याचा, लोकांमध्ये जातीयतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्नही सरकारकडूनच होताना दिसत आहे. त्याला केवळ हे लोकप्रतिनिधी आणि सरकारच कारणीभूत आहे. कारण या लोकप्रतिनिधी कडून सामान्य माणूस कार्यकर्ते शिकण्याचा प्रयत्न करत असतात. त्यांचेच संस्कार समाजात वावरत असतात. मग सरकारमधील लोकप्रतिनिधी असे जर विषमतेच्या संस्काराने, जातीयतेच्या संस्काराने बरबटलेले असतील तर कार्यकर्त्यांवर आणि समाजावर कुठले चांगले समतेचे आणि मानवतेचे संस्कार येणार  ? आज समाजात वावरताना प्रत्येक माणूस एकमेकांकडे पाहत असताना संशयाने पहात आहे. कार्यालयात व गावागावात वागतानाही मनात जातीय द्वेष बाळगूनच वागताना दिसत आहे. जातीय, धर्मीय चष्म्याने पहात आहेत. जातीय, धर्मीय विष आणि द्वेष मनात घेऊन जगणारे अनेक जण समाजातील सामान्य माणसाचे जीवन उद्ध्वस्त करताना दिसत आहेत. त्यांना भीती किंवा धाक उरलेला नाही. कारण शासन शंभर टक्के आपल्या पाठीशी उभे राहणारे आहे. ही खात्री त्यांना वाटत आहे.म्हणून प्रत्येक जण आपले जीवन दबकून जगत आहे. भीतीने जगत आहे.दहशतीत जगत आहे. खरे तर जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीने समाजातील सर्व जनतेचे प्रश्न सोडवून त्यांचे कल्याण कसे करता येईल, सर्वांना सर्वधर्मसमभाव याप्रमाणे कसे वागवता येईल हे पाहणे गरजेचे असते तरीही हे लोकप्रतिनिधी कल्याण करताना तर कधीच दिसत नाहीत. समता निर्माण करताना दिसत नाहीत.उलट जातीवाद, धर्मवाद, विषमतेची पेरणी जोरकसपणे करताना दिसत आहे. त्याच्या या भूमिकेमुळे समाजातील वातावरण बिघडले आहेत. ज्या भारतीय संविधानाने सर्वसामान्य माणसाचे जगणे सुखकर केले आहे, नवजीवन दिले आहे.

त्या संविधानाची पायमल्ली हे लोकप्रतिनिधी पावलोपावली करताना दिसत आहेत. भारतीय संविधानाचे नाव घेऊन रोज संविधानाच्या विरोधी वागताना दिसत आहेत. म्हणून सर्वसामान्य जनतेने निवडून दिलेला लोकप्रतिनिधी जर मतदार राजाची कदर करत नसेल त्याला वाटेल तेव्हा तो पक्ष बदलत असेल तर त्याला त्याची जागा दाखवून द्यायलाच हवी. असे नितीहीन, विश्वासघात करणारे लोकप्रतिनिधी जर आपण निवडून दिले तर या देशाचे लवकरच वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. समाजासाठी झटणारे, समाजात समता निर्माण करणारे, सर्वसामान्य माणसांचे, शेतकरी, शेतमजूर, दिन, दलित, आदिवासी, भटके अशांचे प्रश्न जाणून घेणारे लोकप्रतिनिधी असले पाहिजेत. हे भान लक्षात ठेवूनच आपण आपल्या अमूल्य मताचा उपयोग केला पाहिजे. एका मताची किंमत म्हणजेच लाखोंचे जीवन घडवू शकते एवढी आहे ती केवळ फक्त हजार पाचशेच्या किंवा मटण पार्टी, दारूच्या बाटली एवढी नाही. हे मतदाराने कायम लक्षात ठेवून जागृत असले पाहिजे.

माणसाला पशु बनवण्याची प्रक्रिया सध्या जोरदारपणे चालू आहे ती हाणून पाडण्यासाठी मतदार राजा आता तरी जागा हो. पुरोगामी विचारांची, समतेची, मानवतेची क्रांती करण्यासाठी सज्ज हो. एक चांगला माणुस बनणे महत्त्वाचे आहे.

# जिथे अकारण काहीच घडत नाही ते राजकारण



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सर्व सामान्य माणूस जेव्हा वैचारिक प्रगल्भ होईल.विवेका जागृत ठेवून वास्तव समजुन घेईल आणि भावनिकतेला शुन्य महत्व देईल तेव्हा सनसनाटी आपोआप बंद होतिल.जे आपल्याला अपेक्षित नसतं तेच पाहायला मिळत न पचणार पचवाव लागतं.कोण कधी कोणासोबत कशासाठी एकत्र येईल हे सर्व सामान्य माणसाच्या कल्पकते पलिकडे असतं. सर्व सामान्य माणस याला भावनात्मक घेता म्हणून अशा सनसनाटी वारंवार निर्माण केल्या जातात . सनसनाटी निर्माण करणं निर्माण होणं आणि चर्चा चालू राहण मग ती सकारात्मक असेल असो नकारात्मक पण लोकांना विचार करण्यास भाग पाडण हा राजकारणाचा अविभाज्य भाग असतो. अयोध्या ते द्वारका आणि हास्तीनापुर ते लंका सत्ता नाट्य आणि राजकारण टाळु शकले नाहीत.**

तर उर्वरित ठिकाण यापासून वंचित कशी राहतील अथवा अपवाद कशी ठरतील.कालखंड कोणताही असो सत्ता म्हटलं राजकारण आलंच बहुतांश लोकांच्या मनावर प्रभाव निर्माण करणार राजकारण हे दिसत तितकं सहज आणि सोप नसत .राजकारणाचा प्रभाव नाही असं कोणतंही क्षेत्र सध्यातरी शिल्लक नाही . प्रत्येक क्षेत्रावर  कळत न कळत राजकारणाचा प्रभाव निर्माण झालेला आहे. राजकारण हा सत्ता सुंदरी पर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे सत्ता हि सुंदरी असल्याने ती आपल्याला मिळाली पाहिजे यासाठी प्रत्येकाचं नियोजन चालू असतच. तसं पाहिलं तर सुंदरी हि कोणाला नको आहे .म्हणून सुंदरीसाठी जो तो आपापल्या पद्धतीने प्रयत्न करणारच मग मार्ग कोणताही असो अंतिम धेय्य हे तर सुंदरीच असतं .आणि हेच ध्येय साध्य करण्यासाठी राजकारण तर होणारच हेच राजकारण वरकरणी पडद्यावर जे दिसत तसं पडद्या मागे नक्कीच नसतं.पण पडद्यामागे नेमकं काय असतं हे लोकांना मात्र माहित नसत याचच नाव राजकारण बुद्धीबळाचा पट आणि राजकारणाचा पट हा जवळपास सारखाच असतो .एकदा का पटावर सोंगट्या टाकल्या कि नंतर फक्त जिंकणे आणि जिंकणे हाच मुख्य उदेश असतो . तत्व, निष्ठा, सत्व याला तिलांजली देऊन जिंकण्यासाठी मग त्या पैकी कोणत्याही सोंगटीचा बळी गेला तरी काही हरकत नाही अथवा खेळणाऱ्याला फरक पडत नाही.हा खेळ पाहणारे सर्व सामान्य लोक भावनिक असतात तर खेळवणारे दुरदृष्टी हित डोळ्यासमोर ठेवून बुद्धीने खेळत असतात तिथं भवनिकता हि शुन्य असते.सर्व सामान्य माणसाच्या जे पचणी पडणार नाही त्याला सुद्ध भाषेत राजनिती म्हणतात. राजनिती हा सुद्धा एक युद्धाचा भाग आहे युद्ध म्हटलं कि सगळं आलं .म्हणून राजकारणात अकारण असं काहीच घडत नसतं . प्रत्येक घटनेला एक मोठी किनार असते .सामान्य माणूस हा भावनिक असतो .हिच भावनिकता ओळखून अनेकदा भावनिक लाट निर्माण व्हावी अथवा मुळ विषयापासून लोकांना दुर घेउन जाण्यासाठी अनेक वेगवेगळ्या घडामोडी घडत असतात.अथवा घडण्यासाठी रणनिती आखली जाते .सत्ता कोणतीही असो त्या ठिकाणी असं घडतंच असतं.सर्व सामान्य माणसाला पचणी पडणार नाही अशा घडामोडी घडण म्हणजे नियोजित पटकथेचा एक भाग असतो . निर्माता सोडता सिनेमाची मुळ कल्पना फार इतर कोणालाही नसते.सिनेमा कशासाठी हे निर्माता सोडता कोणीही सांगू शकत नाही. पाहणा-याला सुद्धा फार काही लक्षात येतं नाही.लक्षात येऊ न देण हेच निर्मात्यांच कसब असतं . बाकी याला आपण काय समजतो हा आपल्या विवेकाचा विषय आहे. शह काटशह हे दिसायला वरकरणी असतात काही बाबी विषय हे वेळेनुसार अपरिहार्य असतात. मात्र त्याला वेगळ्या पद्धतीने लोकांसमोर सादर केला जात . बाकी सगळं सिनेमा सारखं पटकथा लिहून सगळं लोकांना एकदाचं पचणी पडणार नाही. म्हणून एक एक कडी आणि एक एक पुडी हाळुहळु वेळेनुरूप सोडली जाते .आणि निर्माण झालेली लाट हि दुसरया लाटेला कमकुवत दुबळ करण्यासाठी वापरली जाते.

यापालिकडे फार काही तथ्य आणि सत्य या मध्ये नसतं. अगदी रामायणा पासुन महाभारता पर्यंत कालखंड कोणाताही असो त्या त्या काळात कालखंडात प्रत्येक बाबा घटना हि  अकारण घडत नाही . त्या मागे भविष्यातील खुप मोठ्या बाबी दडलेल्या असतात. राजे महाराजे पुर्वी दुरदृष्टी ठेवुन रणनितीचा एक भाग म्हणून अनेक वेगवेगळ्या योजनांची आखणी करायचे अनेक  योजना ह्या सर्व सामान्य माणसाला पचणी पडत नाही हे वास्तव आहे पण राजकिय दृष्टीने हा एक रणनितीचा भाग असतो .रणनिती हि कधीच भावनिक नसते .खेळाचा आनंद घेता आला पाहिजे त्रयस्थ म्हणून खेळांकडे पाहयच असतं. तसंच राजकारण या खेळाकडे सुद्धा पाहयच असतं. राजकिय लोक खेळ खेळत असतात आणि सर्व सामान्य लोक त्यावर मंथन चिंतन करत आपला वेळ खर्च करत असतात आणि कधी कधी तर या मधुन सर्व सामान्य माणस टोकाची कटुता घेतात.हि परस्थिती बदलण्यासाठी राजकारणाचा गाभा समाजाला पाहिजे आणि भावनिक न होता राजकारणातल राजकारण समजलं पाहिजे . जेणेकरून भावनिक होऊन आपलं नुकसान होणार नाही.याची काळजी आणि दक्षता घेऊन सामाजिक पातळीवर सतर्क असलं पाहिजे.आणि राजकारणामुळे निर्माण होणाऱ्या लाटांच्या तडाख्यात आपलं आयुष्य आणि भविष्य उध्वस्त होता कामा नये त्यासाठी राजकारणात अकारण काहिच घडत नाही हे आपल्याला समजलं पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# समर्थांसाठी प्रभू श्रीरामानंतर आदर्श राजा छत्रपती शिवाजी महाराज : सरसंघचालक

## श्रीसमर्थ रामदास लिखित वाल्मिकी रामायणाचाच्या संपादित खंडांचे थाटात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** समाजाला दिशा दाखविण्यासाठी आदर्श राजाचे रूप ठेवणे आवश्यक होते. प्रभु श्रीरामाच्या नंतर श्री समर्थांनी आदर्श राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांना ठेवलेले आहेत, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी बुधवारी केले. श्रीसमर्थवाग्देवता मंदिर, धुळें या संस्थेच्या वतीने श्रीसमर्थरामदासस्वामिलिखित वाल्मीकिरामायण या ग्रंथाच्या मूळ सात बाडांचे कांडशः संपादन करून बनविण्यात आलेल्या आठ खंडाचे राष्ट्रार्पण सरसंघचालकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या आठ खंडांमध्ये मुळ हस्तलिखितासमवेत मराठी आणि इंग्रजीत त्याचा अनुवाद मांडण्यात आला आहे. व्यासपीठावर श्रुतिसागर आश्रम, फुलगांव येथील स्वामी स्वरूपानंद सरस्वती, , श्रीरामदासस्वामी संस्थान, सज्जनगडचे बाळासाहेब स्वामी, रा. स्व. संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, श्रीसमर्थवाग्देवतामंदिर, धुळें संस्थेचे अध्यक्ष अनंत चितळे आदींची उपस्थिती होती तर कार्यक्रमास कार्याध्यक्ष देवेंद्र डोंगरे, सत्कार्योत्तेजक सभा, धुळेचे अध्यक्ष विश्वास नकाणेकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय कार्यकारिणीचे सदस्य अनिरूद्ध देशपांडे, सुहासराव हिरेमठ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. सरसंघचालक पुढे म्हणाले की, समर्थांच्या वेळची परिस्थिती आक्रमणाची होती. लढाई हा धर्माच्या संरक्षणाचा केवळ एक भाग आहे. मात्र केवळ लढाई म्हणजे धर्माचे संरक्षण नव्हे. प्रतिकार, प्रबोधन, संशोधन आणि आचरण हे ही धर्माचे संरक्षण आहे. हे सर्व श्रीरामांनी केले. श्रीराम हे आराध्य त्या वेळेच्या जवळजवळ सर्व संतांनी समाजासमोर ठेवले. शाश्वत धर्म काळानुसार कसा पाळावा हे सांगावेही लागते आणि दाखवावेही लागते. समाजाला एकत्र करणे, त्यासाठी प्रवास करणे आणि संवाद साधणे याची कालसुसंगत रचना समर्थांनी केली. ते म्हणाले, आपल्या समोर प्रश्न आहेत. या प्रश्नांसाठी दोन हजार वर्षांत आपण प्रयोग करून थकलो. आता सर्व उत्तरं भारत देईल, ही आशा जगाला आहे. जगाला भारताकडून अपेक्षा आहेत पण भारतीयांना याची जाणीव आहे का, हा प्रश्न आहे. आता गुलामी नसली तरी गुलामगिरीची वृत्ती अजून आहे. राष्ट्रजागृतीचे कार्य सध्या देशात सुरू आहे. ते राष्ट्रव्यापी झाले आहे. मात्र भारतात बुद्धिजीवी क्षत्रियांची आवश्यकता आहे. आपण सर्वांनी त्यासाठी तयार राहायाला हवे, असेही आवाहनही सरसंघचालकांनी यावेळी केले. संस्थेचे माजी अध्यक्ष व प्रकल्प प्रमुख शरद कुबेर यांनी या ग्रंथाच्या निर्मितीची प्रक्रिया विषद केली. प्रास्ताविक प्रा. देवेंद्र डोंगरे यांनी केले.

# घातक हत्यारांसह महिलेची दहशत

## जवाहरनगर पोलिसांनी महिलेस केले जेरबंद

**छत्रपती संभाजीनगर :** जवाहरनगर पोलीसांना मिळालेल्या माहितीवरून काबरानगर, गारखेडा परिसरात आयेशा परवीन सरवर, (रा. काबरानगर गारखेडा) हीने लोखंडी कोयता, धारदार चाकू, छऱ्याची पिस्टल, हॉकी स्टीक घेऊन नागरीकांमध्ये दहशत निर्माण होईल, असे व्हिडीओ बनवून अपलोड केले. या बाबतची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक केंद्रे यांना मिळाली असता व्हिडीओची खात्री करुन, पोलीस निरीक्षक केंद्रे, पोउपनी वसंत शेळके, चंद्रकांत पोटे, मारोती गोरे यांनी सदर महिलेचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई केली. सदर महिलेची घरझडती घेतली असता, घरामध्ये लोखंडी कोयता, धारदार चाकू, छऱ्याची पिस्टल, हॉकी स्टीक शस्त्र आढळून आले. परविन सरवर हिने धारदार शस्त्र हे मुलगा सोहेल सरवर याने आणल्याचे सांगीतले, सदर महिला व मुलगा नामे सोहेल सरवर याचे रेकॉर्ड तपासले असता पोस्टे जवाहरनगर गुरनं 53/2023. कलम- 324,504,506,34. भादवी, पोस्टे जवाहरनगर गुरनं- 77/2020, कलम 302,392,323,504,34. भादवी, पोस्टे जवाहरनगर गुरनं- 326/2021, कलम- 461,380. भादंवि असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. सदर महिलेविरुद्ध पोस्टे जवाहरनगर गुरनं- 171/2023 प्रमाणे शस्त्र अधिनीयम 1959 कलम- 28, 4/25, व महाराष्ट्र पोलीस अधिनीयम 1951 कलम 135, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# भोकर- म्हैसा रस्त्यावर अपघात: एक ठार, एक गंभीर

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** म्हैसा रस्त्यावरील लघू पाटबंधारे कार्यालयात समोर भरधाव येणाऱ्या दूचाकीची बुधवारी (ता.चार) दूपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास समोरासमोर जोराची धडक झाल्याने एका युवकाचा जागीच मृत्यू झाला तर एकजण गंभीर जखमी झाला आहे.

शहरातलगत असलेल्या भोकर-म्हैसा रस्त्यावर म्हैसाकडुन येणारी होंडा दूचाकी क्रमांक (एमएच २० डीएनए/०७८०) आणि भोकरहून म्हैसाकडे जाणारी बूलेट दूचाकी क्रमांक एम एच २६ सीसी/३५११) याची समोरासमोर जोराची धडक झाली.

या अपघातात कृष्णा भिवजी ढवळे (वय २२, रा. चिंचाळा ता.भोकर) यांचा जागीच मृत्यू झाला असून सचिन रोहिदास होळकर (वय २२. राहणार नेवरवाडी ता. हदगाव) हा युवक गंभीर जखमी झाला आहे. येथील ग्रामीण रुग्णालयात जखमींवर उपचार करून पुढिल उपचारासाठी नांदेडला पाठविण्यात आले आहे. अपघात इतका भीषण होता की दोन्ही दुचाकीचा अक्षरा चेंदामेंदा झाला आहे.




महाराष्ट्र Business Katta












# वाढते अपघात; नियमांचे पालन करा



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**दिनांक १ जुलै २०२३ ला समृद्धी महामार्गावर भयावह व अंगावर शहारे येणारा भीषण अपघात झाला. यात २५ लोकांचा होरपळून मृत्यू झाला. यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात शोककळा पसरली. यापाठोपाठ दिनांक ४ जुलैला धुळ्यामध्ये मुंबई-आग्रा महामार्गावरीर शिरपूर तालुक्यातील पळासनेरजवळ कंटेनरच्या धडकेने भीषण अपघात झाला यात १५ जणांचा मृत्यू झाला व २५ पेक्षा अधिक लोक गंभीर जखमी झाले. अशाप्रकारे अपघातांची मालिका कमी न होता दिवसेंदिवस वाढत आहे ही अत्यंत गंभीर व चिंतेची बाब आहे. यावर वाहन चालकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण महाराष्ट्रासह देशात होणारे ८५ टक्के अपघात हे वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे किंवा चुकांमुळे होत असल्याचे दिसून येते,तर १५ टक्के अपघात हे प्रशासनाच्या चुकांमुळे होतांना दिसतात. देशातील अपघातांचा विचार केला तर प्रत्येक तासाला १८ लोकांचा अपघाती मृत्यू होत आहे.**

ही अत्यंत गंभीर, भयावह व चिंताजनक बाब आहे.ज्याप्रमाणे वाहन चालकांसाठी रस्त्यांच्या सुविधा उपलब्ध झाल्यात त्याच गतीने अपघात मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो. ज्याप्रमाणे राज्यात किंवा देशात रस्त्यांच्या अत्याधुनिक सुख-सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्याच गतीने अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.आपले पुर्वज म्हणायचे जेवण सुख तेवढंच दुःख त्याचीच पुनरावृत्ती सध्या होत आहे की काय असे वाटते.आज सुखाच्या भोवऱ्यात आपल्याला दुःखाचा कळस पहायला मिळतो. राज्याच्या जनतेच्या सुविधांच्या दृष्टीकोनातून ७०१ किलोमीटर लांबीचा नागपूर ते मुंबई हा नागपूर द्रुतगती मार्ग (समृध्दी महामार्ग) बनविण्यात आला.या मार्गाचे लोकार्पण ११ डिसेंबर २०२२ झाले.समृध्दी महामार्ग राज्याच्या दहा जिल्ह्यांतून जातो.त्याचप्रमाणे ३९० वेगवेगळ्या खेड्यांना वळसा देवुन जातो.परंतु वाहन चालक आपल्या वाहनाच्या गतीवरील नियंत्रणात न ठेवता वाहन चालवितांना निदर्शनास आले आहे.त्यामुळे आतापर्यंत समृध्दी महामार्गवर अपघातांचा मालिका सुरूच असल्याचे दिसून येते.परंतु अपघाताचे प्रमाण थांबता थांबेना ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.गेल्या सहा महिन्यांपासुन ४५० अपघात व ९७ च्या वर बळी गेलेत. म्हणजेच दररोजचा एक अपघात अशी परिस्थिती समृध्दी महामार्गावरील असल्याचे दिसून येते. समृध्दी महामार्गावरील वेगमर्यादेत थोडीशी ही चुक मोठे अपघाताचे कारण ठरू शकते व ठरत आहे.समृध्दी महामार्गावरील वाढते अपघात पहाता सरकारने ठोस पावले उचलण्याची नितांत गरज आहे.याकरिता प्रत्येक ५० किलोमीटर अंतरावर थांबे आवश्यक आहेत.कारण इंजिन गरम होणे,टायर गरम होणे,वाहन चालकाला थकवा येणे,यामुळे होणारे अपघात यावर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल व वाहन चालकांना विश्रांती मिळेल यामुळे अपघात टाळता येईल.त्याचप्रमाणे वाहन चालकांनी वाहन चालवीतांना डोळ्यात तेल टाकून वाहन चालवायला पाहिजे.कारण गेल्या काही दिवसांपासून समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे.यावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे इतर अपघातांचा विचार केला तर रोडचे खड्डे, रोडचे बांधकाम यामुळे सर्वसामान्यांना आवागमन करण्यास मोठी अडचण निर्माण होते. रोडचे काम सुरू असताना वनवे ट्राफीक असते अशाच ठिकाणी अपघाताचे प्रमाण सुध्दा जास्त दिसून येते.अशाप्रकारे संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढल्याचे आपण पहातो.कारण प्रत्येक व्यक्ती आपल्या कामानिमित्त किंवा नौकरीवर जात असतो.परंतु वाढते रोडचे अपघात पहाता प्रत्येकामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होने सहाजिकच आहे. यावरून स्पष्ट होते की घरून निघालेला व्यक्ती वापस घरी



सुखरूप पोहचेलच याची काहीही हमी नसते ही बाब सध्याच्या होणाऱ्या वाढत्या अपघातावरून लक्षात येते.कोणताही अपघात असो यात एकालाच दोष देता येणार नाही.वाहन चालकांनी आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे असते.त्याचप्रमाणे दुचाकी वाहन चालकांनी घरून निघताना हेल्मेट घालुनच निघायला हवे.कारण कोणताही अपघात सांगुन येत नाही.त्यामुळे या धकाधकीच्या जीवनात स्वतःचा जीव स्वतःलाच सांभाळायचा आहे.वाहन चालवितांना दुचाकी असो अथवा चारचाकी असो आपल्या वाहणाच्या वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे सरकारने व वाहतूक प्रशासनाने दुर्घनांच्या ठिकाणी जातीने लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे.रोडचे अपघात रोखण्यासाठी सरकार, प्रशासना व नागरिक यांच्यात समन्वय असायला हवा.त्याचप्रमाणे वाहतुकीच्या बाबतीत सरकारने किंवा वाहतूक प्रशासनाने घालून दिलेल्या संपूर्ण नियमांचे काटेकोरपणे पालन करणे संपूर्ण नागरिकांचे प्रथम कर्तव्य बनते. कारण "जान है तो जहान है" हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. परंतु राज्यातील अनेक भागात टिप्पर,ट्रक चालकांच्या व इतर वाहनचालक यांच्या निष्काळजीपणामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.याचे अनेक जीवंत उदाहरण सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. यावर वाहतूक प्रशासनाने कठोर पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे.राज्यात व देशात अपघातांची वाढती संख्या अत्यंत चिंताजनक व धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे वाढते अपघात रोखण्यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करणे अत्यंत गरजेचे आहे.वाहन चालकांनी लांब प्रवास करतांना आपल्या वाहनांची हवा वेळोवेळी तपासली पाहिजे.त्याच प्रमाणे समृध्दी महामार्गावरील वाढते अपघात हे वेगवान गाडीच्या गतीमुळे टायर गरम होतात यामुळे सुध्दा अपघात होत असल्याचे सांगितले जाते.याकरिता वाहनांची हवा वेळोवेळी तपासने व थोडी-थोडी वाहनांला विश्रांती देणे गरजेचे आहे वाहन चालकांला सुस्ती येणार नाही याचीही काळजी घ्यायला हवी.यामुळे अपघातावर आळा बसु शकतो. वाहन चालवितांना मुख्यत्वे करून मोबाईलचा वापर करूच नये,मद्य प्राशन करून ड्रायव्हिंग करू नये, सिग्नलला वाहन जंप करू नये, कुठेही जातांना

# डोक्यावर कोरड्या दुष्काळाचे ढग!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**यंदाच्या हंगामात विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी बीज पेरले, परंतु ते पावसाच्या महिन्याभराच्या दडीमुळे उगवलेच नाही. आता तो दुबार पेरणीबद्दल विचार करू लागला आहे, हे साहजिकच आहे. प्रारंभी सतत तिन दिवस आलेल्या रिमझिम पावसाने शेती ओली झाली. त्यामुळे कृषक बंधू हरखून गेला आणि धान पळे भरले, पेरणी करण्याच्या कामी लागला. पेरणी पूर्ण होत नाही तर पावसाने कायमची दडी मारली. मातीखाली गेलेले धान्य पावसाच्या अभावाने अंकुरलेच नाही. काही दाणे अंकुरले मात्र ते अंकूर मातीच्या पापडीतच गुदमरून जळून गेले. आता मात्र शेतकऱ्यांच्या डोक्यावर दुबार पेरणीचे खूळ स्वार झाले. यंदा पाऊस पडला नाही तर कोरडा दुष्काळ पडू शकतो. स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत महाराष्ट्राने अनेक दुष्काळ पाहिले आहेत. पण या वर्षीच्या दुष्काळाने कहर केला आहे.**

पिण्यासाठी पाण्याचा अभाव, जनावरांना चारा छावणीत नेऊन ठेवण्याची पाळी, ग्रामीण भागात रोजगारीचा अभाव व त्यामुळे जवळच्या शहरांकडे ग्रामस्थांची होणारी वाटचाल ही या वर्षीच्या दुष्काळाची ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात. मी बहुत्तेक २ वर्षाचा असेन त्याकाळी म्हणजेच सन १९७२ सालीसुद्धा असाच मोठा दुष्काळ पडला होता. वडिलधारी मंडळी त्या दुष्काळाची नेहमी आठवण काढत असत. दोन वाईट गोष्टींची तुलना करू नये, पण तो दुष्काळ या दुष्काळाच्या मानाने सुसह्य होता. कारण त्या दुष्काळात पिण्याच्या पाण्याची परिस्थिती आजच्या मानाने बरी होती. याचे प्रमुख कारण म्हणजे स्वतःचे पोट भरण्याच्या हव्यासापोटी मानवाने जमिनीचे पोट आजच्या सारखे रिकामे करून ठेवले नव्हते. ६० वर्षांपूर्वी आम्ही जेव्हा खेळते बागडते होतो, त्यावेळी आम्हाला शिकविले गेले की पाच वर्षातून एक हंगाम चांगला, एक बरा व तीन कष्टदायक, अशी परिस्थिती असते. आजही साठ वर्ष उलटून गेल्यावर सुद्धा या परिस्थितीत काहीही बदल झालेला दिसत नाही. हे केव्हा तर सिंचनावर लाखो करोडो रूपये खर्च केल्यावर. आपल्या नियोजनात काही चुकत तर नाही ना अशी शंका यावयास जागा निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आल्याला दुष्काळ निवारणाबद्दल विचार करायचा आहे.

या वर्षीच्या दुष्काळाची काही प्रमुख कारणे दाखविता येतील. त्या कारणांची मीमांसा सदर लेखात करण्यात आली आहे- १) पाणी अडविण्यातील हयगयः गेल्या काही वर्षांपासून पावसाचा स्वभाव बदलला आहे. तो उशीरा सुरू होतो, लवकर संपतो, पावसाचे दिवस कमी होत चालले आहेत, पावसाच्या प्रमाणात मात्र म्हणावा तसा फरक पडलेला नाही व म्हणूनच पावसाचा वेग खूपच वाढला आहे, ही या नवीन पाऊस पध्दतीची वैशिष्टये आहेत. वेगाने पडणारा पाऊस पाणी जमिनीत मुरण्यास प्रतिबंध करतो, तो वेगाने पडतो व वेगाने वाहून जातो. जमिनीत पाणी मुरण्यासाठी त्याच्या वेगावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे आणि आपले नेमके येथेच चुकत आहे. धावते पाणी चालते करा, चालते पाणी रांगते करा, रांगते पाणी थांबते करा व थांबते पाणी जिरते करा हा जलसंवर्धनाचा सोपा मार्ग आहे. आपल्याला पावसात बदल होत आहे, याची जाणीव नाही व ती असली तरी हे थांबवण्यासाठी काय करायचे? याची माहिती नाही या संभ्रमात आपण सापडलो आहेत. पावसाचा वेग कमी करण्यात वृक्षराजी आपल्याला मदत करत असते व त्याची गती आणखी कमी करण्यासाठी कुरणे अथवा गवत मदत करत असते. पण आपण इतके कपाळकरंटे आहोत की मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करून आपण मोकळे झालो आहोत. वृक्षांचा आणखी एक मोठा लाभ असतो. तो म्हणजे जेव्हा झाडांची मुळे जमिनीत प्रवेश करतात, तेव्हा ती जमिनीतील खडकांना फोडण्याचे काम करित असतात. त्यामुळे दगडांमध्ये ज्या अगणित फटी निर्माण होतात त्यातून पाण्याचा जमिनीत प्रवेश होतो व भूजल पातळी वाढण्यास मदत होते. एका माणसाला जगण्यासाठी जेवढा प्राणवायू आवश्यक असतो, तो मिळविण्यासाठी त्याला किमान ७ झाडांची आवश्यकता असते. आज झाडे कमी झाल्यामुळे वातावरणात निर्माण झालेला कर्बवायू शोषण्यात आपण कमी पडत आहोत. त्याचा विपरित परिणाम पर्यावरणावर झालेला आढळतो. वृक्षराजी वाढल्यास पर्यावरण संतुलन साधून, आज जो पावसात अनियमितपणा आला आहे तो घालवून, पावसात स्थैर्य आणण्याच्या दृष्टीने आपण वाटचाल करू शकू.

सध्यातरी पावसात जो अनियमितपणा आला आहे, तो आपण थांबवू शकत नाही. ही वस्तूस्थिती आहे. या नव्या पाऊस पध्दतीत बदल घडवून आणणे आपल्या हातात नाही. यासाठी आपल्याजवळ फक्त एकच पर्याय उरतो. तो म्हणजे आपण आपल्यात बदल घडवून आणणे. हे मात्र आपल्या हातात आहे. पाऊस केव्हा पडेल? याचा भरवसा राहिलेला नाही. तो पडेल तेव्हा पडू देत. हा पडलेला पाऊस आपण जास्तीत जास्त प्रमाणात कसा अडवू शकू यातच आपली ठाकूरकी आहे. महाराष्ट्रात सध्या आपण पडलेल्या पावसापैकी फक्त १० ते १२ टक्के पाऊस अडवितो, अशी आकडेवारी सांगते. सर्वच्यासर्व पाऊस आपण जरी अडवू शकलो नाही, तरी जास्तीत जास्त पाऊस अडविण्यास कोणती हरकत आहे? हे पावसाचे पाणी कृत्रिम पद्धतीने जमिनीत मुरविणे, यावर आपल्याला विचार करण्याची गरज आहे. गावातील प्रत्येक शेतकऱ्याने स्वतःच्या शेतात शेततळे खणल्यास संपूर्ण गावात पाण्याचा किती मोठा संग्रह होऊ शकेल? बीज मिळविण्यास, रासायनिक खते मिळविण्यास, कीटकनाशके मिळविण्यास शेतकरी जेवढा प्रयत्न करतो, तेवढा प्रयत्न तो पाणी अडविण्यासाठी करतो काय? हा खरा प्रश्न आहे. पाणी नसेल तर वरील सर्व प्रयत्न विफल ठरतात, हे त्याला कुणी समजावून सांगावे? प्रत्येक गावात पाणी चळवळ सुरू व्हावयास हवी. पाण्याची साठवणूक ही शेती विकासाची गुरूकिल्ली आहे, याची जाणीव शेतकऱ्याला करून देणे गरजेचे आहे. त्यांने पाण्याचा योग्य साठा केल्यास वर्षातून दोन पिके काढणे त्याला सहज शक्य आहे. शेततळे खणणे हा पाणी अडवण्याचा व साठवण्याचा एक मार्ग झाला. या शिवाय शेतात नाल्यांमधून वाहणाऱ्या पाण्याला थांबविण्यासाठी दगडी व मातीचे बंधारे बांधणे, शेतातील उताराला आडवी नांगरट व पेरणी करणे, गावातील तलावांमधील गाळ काढून त्यांना अधिक खोल करणे, सार्वजनिक ठिकाणी नवीन तलावांचे खोदकाम करणे, यासारखेही कार्यक्रम हाती घेतले जावू शकतात. या संदर्भात शिरपूर पॅटर्नचा खास उल्लेख करणे गरजेचे ठरते. श्री.अमरीशभाई पटेल व त्यांचे सहकारी श्री.सुरेश खानापूरकर यांनी धुळे जिल्ह्यात केलेला प्रयोग अफलातून आहे. नाले खोल करणे, रूंद करणे व प्रत्येक नाल्यांवर १५ते २० बंधारे बांधणे हे काम त्यांनी ३५ गावांत पूर्ण केले असून त्या ठिकाणी भूजलाची पातळी वाढत वाढत १५ ते २० फूटांवर आलेली आहे. हा प्रयोग दीडशे गावापर्यंत पोहोचविणे, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून वेगाने त्यांचे काम सुरू आहे. त्यांचे प्रयोग शास्त्राला धरून नाहीत अशी टिका सरकारी खाते करीत आहेत. पण त्यांच्या कामाचा प्रत्यक्ष लाभ दिसत असतांना त्याकडे डोळे झाक करणेही योग्य नाही. त्यांनी तर मला १० कोटी रूपये द्या, मी जालना परिसराचा पाणीप्रश्न एका वर्षात सोडवून दाखवितो, असा विडा उचललेला आहे. मागील वर्षी मी काही मित्रांबरोबर गुजराथ राज्याचा अभ्यास केला त्यावेळी तिथे सुद्धा असाच प्रयोग यशस्वी झालेला बघितला आहे. सध्या शेतकऱ्यांना शेतात बोअर खणण्याचा छंदच लागला आहे. त्यांची अशी समजूत आहे की जमिनीच्या आत भरपूर पाणी साठलेले आहे, बोअर खणणे म्हणजे आपण त्या साठ्यापर्यंत सहज पोहोचू शकू. लातूर जिल्ह्यातील उदाहरण तर डोळे पांढरे करणारे आहे. दररोज १००० ते १२०० फूट खोल १५० बोअर्स खोदण्याचे काम वेगाने सुरू असून इतक्या खोल पातळीतून पाणी उपसण्याचा वेडेपणा शेतकरी करित आहेत. हे पाणी शेकडो वर्षांपूर्वी जमा झालेले असून उपसा सुरू झाल्यावर काही काळच फक्त हा पाणी पुरवठा चालू राहाणार आहे. तो संपला म्हणजे नवीन बोअर खोदण्यास शेतकरी मोकळे. या संदर्भात गुजराथमधील एक बोलके उदाहरण देण्याचा मोह होत आहे. राजकोट परिसरात एक व्यापारी डिटोनेटर्सच्या व्यवसाय करतो. त्याच्याकडे एक शेतकरी विहीर खोल करण्यासाठी तोटे खरेदी करण्यास आला. त्याचा चेहरा व्यापाऱ्याच्या लक्षात राहिला. दोन वर्षांनंतर तोच शेतकरी पुन्हा तोटे विकत घेण्यासाठी जेव्हा आला त्यावेळी तो व्यापारी संभ्रमात पडला. पाणी मिळविण्यासाठी विहीर खोल करणे हा मार्ग नसून विहीरीत पावसाचे पाणी जमा करणे हा सोपा मार्ग असून त्याचा वापर करणे देशाच्या दृष्टीने आवश्यक आहे, ही गोष्ट त्याच्या लक्षात आली व परिसरात त्याने जलपुनर्भरणाची चळवळ सुरू करून शेकडो शेतकऱ्यांना पाणी प्रश्नावर मात करण्याचा गुरूमंत्र दिला. २) पाण्याचा चुकीचा वापरः पाणी नसणे हे जितके वाईट, त्याहीपेक्षा असलेल्या पाण्याचा चुकीच्या मार्गाने वापर करणे त्याही पेक्षा वाईट ठरते. सध्या आपण ज्या पद्धतीने जलसिंचन करतो, ती प्रवाही सिंचन पद्धती तर मूर्खपणाची परिसीमा आहे. या पद्धतीत आपण पिकाला पाणी न देता जमिनीला पाणी देत आहोत व पाण्याचा नासोडा करत आहोत. प्रत्येक पिकाची पाण्याची गरज ठरलेली असते. त्यापेक्षा जास्त पाणी पिकाला देणे हानीकारक ठरते. शेतकऱ्याची सर्वसाधारण समजूत असते की जास्त पाणी म्हणजे जास्त उत्पादन. या चुकीच्या समजूतीतून त्याला आपण बाहेर काढले पाहिजे.

**क्रमशः**



# भ्रष्ट नेत्यांना सामावून घेणारा आणि मंत्रीपद देणारा पक्ष म्हणजे...

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414


लेखांक : २३

अलिकडे भ्रष्ट नेत्यांच्या शुद्धीकरणाची प्रक्रिया खूप सोपी करण्यात आली आहे.... आमच्याकडे या आणि पवित्र व्हा..! सध्या भारतात सर्वात मोठा पक्ष म्हणून ज्याचे नाव घेतले जाते अशा एका पक्षाने आपली एकेकाळी असलेली तत्ववादी भूमिका बाजूला ठेऊन वेगळी खेळी खेळायला सुरुवात केली आहे. भ्रष्ट नेत्यांची कुंडली काढायची आणि बड्या नेत्यांना इडीच्या नोटीसा द्यायच्या. बड्या नेत्यांना टार्गेट केल्यामुळे लहान लहान भ्रष्ट नेत्यांना इडीच्या दहशतीखाली ठेवायचे. सध्या भ्रष्ट नेत्यांच्या मनात एकच प्रश्न आहे.. तो म्हणजे स्वतःला वाचवून, स्वतःची संपती वाचवायची कशी ? भाजपाने भ्रष्ट नेत्यांना इडी लावायची जोरदार भीती दाखवल्यामुळे भाजपाचे सोडून इतर पक्षाचे आमदार धास्तावले आहेत. इडीच्या भीतीचा अर्थ असा की, आमच्या पक्षात या आणि भ्रष्टाचारमुक्त व्हा.! नसेल यायचे तर जेलमध्ये सडत बसा...मग अनेक भ्रष्ट नेत्यांना वाटते जेलमध्ये सडत बसण्यापेक्षा भाजपमध्ये गेलं तर काय वाईट ? मंत्रीपदही मिळते आणि क्लिनचिटही मिळते. म्हणून पक्षाचे नियम, अटी, कायद्याचे नियम धाब्यावर बसवून, सगळी नैतिकता, निष्ठा, पक्षाची तत्वे गुंडाळून अनेक भ्रष्ट नेते भाजपमध्ये दाखल होत आहेत, काही झाले आहेत. काही होतील... याही पलिकडे जाऊन सांगावयाचे झाल्यास सत्ता टिकविण्यासाठी भाजप पक्ष एकाच नेत्याला बोलावत नाही, तर अनेक आमदार सोबत घेऊन आले पाहिजे असा एक अप्रत्यक्ष गुप्त दंडक असू शकतो, म्हणजे भाजप आणि इतर पक्षाची युती आहे असं दाखवून सरकार चालवता येतं. अशी ही भाजपची पद्धतशीर खेळी सुरू आहे.

महाराष्ट्रात शिवसेना, कॉंग्रेस, व राष्ट्रवादी यांच्या महायुतीची महाविकास आघाडी होती. राष्ट्रवादी पक्षाचे इतर दोन पक्षापेक्षा जास्त आमदार असल्यामुळे विरोधी पक्षाची भूमिका राष्ट्रवादी पक्ष बजावत होता. विरोधी पक्षनेतेपदी मा. अजित दादा पवार होते. मात्र अजित दादांनी अचानक निर्णय घेऊन भाजपासोबत हात मिळवणी केली. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणारा पक्ष आहे, असे काही टक्के जनतेचे मत होते.... माझाही काही प्रमाणात विश्वास होता... मात्र महाविकास आघाडी पक्षातले विरोधी पक्षनेते अजित दादा पवार यांनी स्वतःच्याच पक्षाविरुद्ध बंड करून भाजपमध्ये उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली... भाजप पक्षाने देवेन्द्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री असतांना पुन्हा अजित दादांना उपमुख्यमंत्री का केले असावे ? आता महाराष्ट्राला दोन दोन उपमुख्यमंत्री मिळाले. हे तर महाराष्ट्राचे अहोभाग्यच म्हणावे लागेल ! परंतु महाराष्ट्राला दोन उपमुख्यमंत्र्यांची गरज आहे का ?

महाराष्ट्रात भाजप आणि शिंदे सेनेचे सरकार चांगले काम करत असतांना भाजपाने अजित दादांना भाजपासोबत येण्याचे निमंत्रण का दिले असावे ? अजित दादांनी एकदा भाजपाचा भूलभूलैया केल्याची भाजपला आठवण नाही का ? आठवण जर असली असती तर अजित दादांना पुन्हा भाजपासोबत युती करण्याचे निमंत्रण दिले असते का ? याचे उत्तर.... नाही असेच असले असते. मात्र राष्ट्रवादीने स्वतःचे दोन तुकडे करून एक तुकडा भाजपसोबत पाठवला...आणि मुख्य तुकडा मात्र मूळ राष्ट्रवादीचा आहे.

राष्ट्रवादीचे मा.अजित दादा यांनी देवेन्द्र फडणवीस साहेबांसोबत सकाळीच शपथविधी उरकून भाजपला फसवले होते, हा राग देवेन्द्र साहेबांच्या मनात असल्याने देवेन्द्र फडणवीस साहेबांनी अजित दादांबद्दलच्या रागाची गरळ २४ नोव्हेंबर २०१९ रोजी एबीपी माझाच्या चॅनेलवर ओकली होती तेव्हा मा देवेन्द्रजी फडणवीस काय म्हणाले होते... ?



या चॅनलच्या माझा कट्ट्यावर पत्रकार परिषदेमध्ये देवेन्द्र फडणवीस यांना एका पत्रकाराने रोकठोक सरळ प्रश्न विचारला होता की, समजा उद्या अजित पवार भाजपमध्ये आले तर सिंचन घोटाळा महाराष्ट्रात झालाच नव्हता असं तुम्ही म्हणणार ? यावर उत्तर देताना देवेन्द्र फडवणीस म्हणाले होते... "अशा मानसिकतेचे आम्ही नाही. एक गोष्ट लक्षात घ्या ! अजित पवारांना भाजपमध्ये स्थान नाही. अजित पवारांना भाजपमध्ये स्थान नाही, कुठल्याही परिस्थितीत नाही. कुठलेही डबल स्टँडर्स नाहीत. शेवटी पोलिटिकल स्टॅटेजीचा भाग म्हणून काही गोष्टी केल्या असल्या तरी देखील सांगतो भारतीय जनता पार्टी आपल्या मूळ विचारापासनं कधीही दूर जाणार नाही. हा जो सिंचन घोटाळा आहे या सिंचन घोटाळ्याची चौकशी आमचं सरकार पूर्ण करेल आणि याच्यातले जे जे दोषी असतील जे जे.. ( जे जे वर जोर देत ) प्रत्येक व्यक्तीवर त्या ठिकाणी कारवाई होईलच." असे ठामपणे निर्वाणीचे विधान करणाऱ्या फडणवीसांनी आपल्या पक्षाचा मूळ विचार का खोटा ठरवला ? आता आपल्या मूळ विचारापासून भारतीय जनता पार्टी दूर गेली नाही का ? याबाबत भाजपला आत्मपरीक्षण करण्याची गरज नाही का ?

स्वतःला भाजपचे चाणक्य म्हणवून घेणारे देवेन्द्रजी फडणवीस साहेब एकदा सकाळीच अजित दादांसोबत शपथ घेऊन फसले होते. तो घाव विसरले की, काय ? आणि आता दुसऱ्यांदाही अजित दादांसोबत शपथविधी करून घेऊन पुन्हा एकदा फसले आहेत का ?... यावेळीही त्यांची चाणक्यनिति फेल जाण्याची शक्यता असेल का..? कारण भारतीय जनता पार्टीला निवडणूका न घेताच आपलं सरकार कसं टिकून राहील यासाठी इतर पक्ष फोडून आमदार आयात करणं हे त्यांना सोपं वाटत असलं तरी भाजपाच्या ह्या फोडाफोडीच्या राजकारणाने कर्नाटक सारखी महाराष्ट्रातली सत्ता कशी आणि कधी गमावली जाईल याचा थांगपत्ताही लागणार नाही.

शिवसेना पक्षाचे दोन तुकडे करणाऱ्या फडणवीस साहेबांनी राष्ट्रवादीचेही दोन तुकडे केले. शिवसेना पक्ष फोडायला सोपा होता हे समजू शकतो; परंतु राष्ट्रवादी पक्ष फोडायला तूर्तास जरी त्यांना सोपा वाटला तरी तितका सोपा नाही. आदरणीय शरद पवार साहेब ही भाजपची खेळी भाजपच्याच अंगलट आणू शकतात... हेही भाजपाने गृहित धरायला काय हरकत आहे..?

भारतीय जनता पार्टीच्या अनेक धोरणावर भारतीय जनता बोलत आहे. लोकशाही आडून चालू असलेल्या हुकुमशाहीला सामान्य माणूस त्रस्त आहे. माणसे आणि पक्ष फोडफोडीच्या राजकारणाला आणि धर्माधर्माच्या नावाने दंगली लावून तरूणांची डोके भडकवण्याचे काम सत्तेची पोळी भाजण्यासाठी केले जात आहे. कोणत्याच पक्षाला विचारधारा राहिलेली नाही.

अलिकडे तर मोठ्ठा राजकीय गोंधळ झालाय. मतदारही या गोंधळात सापडलेला आहे. चांगल्या चांगल्या विद्वानांसह सामान्य माणसाची मती गुंग झाली आहे.

सगळ्याच पार्ट्या आता पक्षाच्या विचारधारेचा तमाशा करू लागल्या आहेत. कोणत्याच पक्षाकडे आता निष्ठा, नीतिमत्ता, विचारधारा, तत्वे राहिलेली नाहीत. 'सत्ता एके सत्ता' हा एकच पाढा नेत्यांच्या मनात घोळत आहे. महाराष्ट्राचा मतदारही २०२४ च्या निवडणूकीमध्ये कोणत्या पक्षाला मतदान करावे ? या संभ्रमात असेल..!

# पेरण्या रखडल्या



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**जून महिना संपला तरी राज्यात पावसाने म्हणावा तसा जोर धरलेला नाही. राज्यातील बहुतांश भागात जून महिना कोरडाच गेला आहे. मान्सूनपूर्व पावसानेही दगा दिला आहे. जून महिन्यात सरासरी इतकाही पाऊस झाला नाही त्याचा विपरीत परिणाम पेरण्यांवर झाला आहे.**



जून महिन्यात सरासरीच्या पन्नास टक्केही पाऊस झाला नाही. देशात सर्वात कमी पाऊस मराठवाड्यात झाला आहे. मराठवाड्यावर वरून राजाची कायमच वक्रदृष्टी राहिली आहे. मृग नक्षत्र कोरडे गेले. आदरा नक्षत्रात काही ठिकाणी पाऊस झाला असला तरी नक्षत्र संपेपर्यंत दमदार पाऊस होईल की नाही याची शाश्वती देता येत नाही त्यामुळे पेरण्या करण्यास बळीराजा धजावला नाही परिणामी मराठवाड्यात फक्त एक टक्का पेरण्या झाल्या आहेत. राज्यातील इतर भागातही जवळपास हीच परिस्थिती आहे. बळीराजा पावसाचा अंदाज घेऊन पेरण्यांचे नियोजन करत आहे. मात्र ज्यांनी पेरण्या केल्या ते वरुण राजाला विनवणी करत आहेत. कारण वेळीच आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर दुबार पेरणीचे संकट बळीराजावर ओढवू शकते. गेल्यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने या काळापर्यंत बहुतेक ठिकाणी पेरण्या पूर्ण झाला होत्या. यावर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने कपाशी, धान, सोयाबीन, कडधान्ये या मुख्य पिकांच्या पेरण्या रखडल्या आहेत. पेरण्या रखडल्याने बळीराजा चिंतेत असला तरी समाज आणि प्रशासनाला त्याचे काही सोयरसुतक दिसत नाही. बळीराजा आभाळाकडे नजर लावून बसला असताना राज्यातील लोक आणि प्रशासन यंत्रणा मात्र हातात रिमोट घेऊन टीव्हीवर राजकीय महानाट्य पाहण्यात मग्न आहेत. पाऊस पडला काय आणि नाही पडला काय आपल्या जीवनात काय फरक पडतो. अशा आविर्भावातच सर्वजण वागत आहेत. मात्र पुरेसा पाऊस न झाल्यामुळे पेरण्या रखडल्या तर बळीराजालाच नव्हे तर सर्वांनाच बसणार आहे. पाऊसपाण्याची वेदना केवळ बळीराजाची वाटत असली तरी प्रत्यक्ष तिचे व्यापक परिणाम होत असतात. उत्पादन कमी झाले तर अन्नधान्याच्या किंमतीवर त्याचा परिणाम होत असतो आणि सगळ्यांनाच महागाईचा सामना करावा लागतो. सर्वसामान्य आणि नोकरदारवर्गाची आर्थिक कुचंबणा होते. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याचीही टंचाई निर्माण होते. याउलट जर पाऊस चांगला झाला, वेळेवर पेरण्या झाल्या, भरघोस पीके आली तर त्याचा बाजारपेठेवर आणि एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा चांगला परिणाम होतो. सरकारलाही विकास कामांसाठी पैसा उपलब्ध होतो. बळीराजाचे नुकसान झाले की सारकरला त्यांना नुकसानभरपाई द्यावी लागते त्यामुळे विकास कामांना कात्री लागते. एकूणच पावसाअभावी पेरण्या रखडल्या तर त्याचा खूप दूरगामी परिणाम होतो. हा परिणाम केवळ बळीराजवरच नाही तर समाजातील सर्व घटकांवर होतो त्यामुळेच आता जुलै महिन्यात तरी वरुण राजाने कृपा करावी असे साकडे बळीराजा वरुण राजाला घालत आहे. जर वरुण राजाने कृपा केली नाही आणि जुलै महिना जून महिन्याप्रमाणेच कोरडा गेला तर बळीराजा हतबल होईलच पण त्याचा परिणाम राज्याचा अर्थव्यवस्थेवर देखील होईल.

# देशातील बेरोजगारीचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागाला


आधुनिक केसरी

बेरोजगारीचा दर या आधीच्या म्हणजे मे महिन्यात ७.६८ टक्के पातळीवर होता. त्यात जूनमध्ये वाढ होऊन तो ८.४५ टक्क्यांवर पोहोचला आहे. शहरी भागातील बेरोजगारीचा दर ७.८७ टक्के, तर ग्रामीण भागात हा दर दोन वर्षांतील उच्चांकी पातळीवर ८.७३ टक्क्यांवर पोहोचला आहे.देशातील बेरोजगारीचा दर जून महिन्यात ८.४५ टक्के नोंदविण्यात आला असून, यावर्षी तिसऱ्यांदा हा दर आठ टक्क्यांपुढे गेला आहे. ग्रामीण भागातील लक्षणीय पातळीवर पोहोचलेली हंगामी बेरोजगारी यासाठी कारणीभूत ठरली, असे 'सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी'ने जाहीर केलेल्या आकडेवारीतून स्पष्ट झाल्याचे वृत्त आहे बेरोजगारीचा दर या आधीच्या म्हणजे मे महिन्यात ७.६८ टक्के पातळीवर होता. त्यात जूनमध्ये वाढ होऊन तो ८.४५ टक्क्यांवर पोहोचला आहे. शहरी भागातील बेरोजगारीचा दर ७.८७ टक्के, तर ग्रामीण भागात हा दर दोन वर्षांतील उच्चांकी पातळीवर ८.७३ टक्क्यांवर पोहोचला आहे. ग्रामीण भागातील बहुतांश जनता प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. पिकांची काढणी मे महिन्यात पूर्ण झालेली असते आणि पेरणीचा हंगाम यंदा मान्सूनचे आगमनच उशिरा झाल्याने जुलैपासून सुरू होत असल्याने जून महिन्यात शेतीची फारशी कामे नसतात. त्याचा परिणाम ग्रामीण बेरोजगारीची पातळी लक्षणीय वाढण्यात झाला, असे प्रतिष्ठित संशोधन गट असलेल्या 'सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी'ने म्हटले आहे.केंद्र सरकार समोर बेरोजगारी कमी करण्याचे मोठे आव्हान आहे. मागील काही काळात विविध सरकारी विभागांमधील कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे वाटपाचे कार्यक्रम घेतले जात आहेत. त्यांनी या वर्षाच्या अखेरपर्यंत दहा लाख जणांना सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन दिले आहे. तरीही बेरोजगारीचा दर वाढत असल्याने सरकारच्या चिंतेत भर पडत आहे.श्रम बाजारपेठेत सध्या फारशी सक्रियता नाही. देशातील दोन-तृतीयांश लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील बेरोजगारीचा दर सध्या जास्त आहे. पुढील वर्षी लोकसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे भाजपला पुन्हा सत्तेवर येण्यात बेरोजगारीचा मुद्दा सर्वांत मोठा अडसर ठरण्याची चिन्हे आहेत. या सध्याच्या काळातील मोठ्या आव्हानावर सरकारला दोन्ही पर्वात फारशी कामगिरी करता आलेली नाही हेच खरे !

राजू जाधव, मांगूर, जि.बेळगांव



# दुडिया : तुझ्या जळत्या छत्तीसगडात !



व्यंकटेश देवनपल्ली
संपर्क क्र. ९५३५०२२११२

आधुनिक केसरी

**विश्वास पाटील हे मराठी साहित्य विश्वातील एक चिरपरिचित, प्रतिष्ठित, ख्यातनाम नाव आहे. यापूर्वी त्यांच्या पानिपत, महानायक, झाडाझडतीव इतर कादंबऱ्या गाजलेल्या आहेत. अलीकडेच शिवाजी महाराजांच्या जीवनावर लिहिलेल्या 'झंझावात' व 'रणखैंदळ' या कादंबऱ्यांनी विक्रीचा उच्चांक गाठलेला आहे. त्याच घाईगर्दीत नुकतीच त्यांची 'दुडिया:तुझ्या जळत्या छत्तीसगडात! ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. पाटीलह्यांनी या कादंबरीसाठी मात्र एका अतिशय वेगळ्या पार्श्वभूमीचा आणि प्रखर असा विषय निवडला आहे. नुकतेचया पुस्तकाचे हिंदीत व इंग्रजीतही भाषांतर झाले आहे. विश्वास पाटील यांची कथा सांगण्याची हातोटी आणि त्यामागील संशोधन नेहमीच वाखाणण्याजोगे असते हे वेगळे सांगायला नको.**

कुठलाही विषय ते अशा पद्धतीने मांडतात की त्यात पुढे काय होणार आहे ह्याविषयी वाचकाला उत्सुकता लागून राहते. कादंबरीतील घटना वा प्रसंग चक्षुर्वैसत्यम वाटण्याइतके आपल्या समोर जसेच्या तसे उभे करतात. हीच तर पाटील यांची खासियत आहे. नक्षलवादाच्या पार्श्वभूमीवरील या कादंबरीत नक्षलवादाची समस्याच नव्हे तर त्या भागातील वास्तविक परिस्थिती आणि ह्या समस्येमुळे भरडले जाणाऱ्या जनसामान्यांचेही चित्रण आहे. आजवर एकतर नक्षलवादी बंडखोर आहेत किंवा सरकारसाठी ते अडचणीचे कारण आहेत किंवा ते गरीब लोक आहेत, असंच चित्र त्या विभागाच्या बाहेर असलेल्या लोकांच्या समोर आहे. नक्षलवादी संघटना ही 'जल, जमीन आणि जंगल' पळवायला आलेल्या सामर्थवान उद्योगपतींच्या कचाट्यातून सोडवायला आलेले तारणहार आहेत असाही एक समज आहे. परंतु नक्षलवाद्यांमुळे त्या भागातीलठासलेल्या मशीनगन्सच्या पेचात अडकलेल्या जनतेची ही संघर्षमय कहाणी आहे.स्फोटकाने पेटलेली तिथली अरण्यं, जीव मुठीत धरून राहणारे लोक आणि निधड्या छातीने सामोरे जाणारे पोलीस हे सगळं एका मोठ्या कॅनव्हासवर चित्रित करण्यात आले आहे. त्यात सांभाळला गेलेला समतोल हेच ह्या पुस्तकाचे बलस्थान आहे.

दुडिया या आदिवासी मुलीच्या दृष्टिकोनातून जेव्हा परिस्थिती पाहिली जाते, तेव्हा काही गोष्टी आपोआप समजतात. पुस्तक वाचत असताना प्रत्यक्ष तो परिसर, ती घनदाट जंगले तुडवताना येणारा थरार चक्क अनुभवत असल्याची जाणीव होते. एखाद्या चित्रपटातील काल्पनिक कथेवर आधारलेले चित्रण कॅमेऱ्याच्या डोळ्यांनी पाहणे वेगळे पण छत्तीसगडमधील प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेली आणि कानांनी ऐकलेली खबरबात वाचत राहणे हा एक वेगळा अनुभव आहे. कित्येक वेळासामान्य माणसासाठी पोलिसांची बंदूक आणि नक्षलवाद्यांची बंदूक या दोन्ही सारख्याच असतात, हे विधान मांडण्यात ही कादंबरी यशस्वी ठरली आहे.




त्या तिथल्या लोकांचे जीवन दुधारी तलवारीवर चालत जाण्यासारखे आहे.

'दुडिया' ही कादंबरी नक्षलवादाच्या समस्येवर प्रकाशझोत टाकते.हे समृद्ध राज्य कोणत्याही विद्रोही, बंडखोर लोकांमुळे नव्हे तर उच्च पदांवर बसलेल्या लोकांच्या अहंकारामुळे, माणसाच्या लोभी आणि मानव निर्मित समस्यांमुळे अशा परिस्थितीतून जावे लागत आहे, हे लेखकाने फारच व्यवस्थितपणे मांडले आहे.उदाहरणादाखल, 'ह्या नक्षलींचा प्रभाव इकडे वाढलाच कसा ?'या प्रश्नावर तिथले डीवायएसपी प्रांजळपणे कबुली देताना म्हणतात, 'नक्षलींच्या रोगाचा हा तोहफा आम्हांला दुसऱ्या कोणी दिलेला नाही, पिढ्यांपूर्वी या राज्यात विविध खात्यांत काम करणाऱ्या सरकारी बाबू तेव्हा इथल्या गरीब आदिवासींचे शोषण आणि गैरवर्तणुकीचा जो घातला, त्याचीच फळे आम्ही आज भोगतो आहोत झालं.'

ही कादंबरी केवळ नक्षलवादाच्या समस्येभोवतीच ही कथावस्तु मांडत नाही तर जे वास्तविक समस्येचा सामना करत आहेत अशा लोकांच्या स्थितीबद्दल आणि नक्षलवादाचा त्यांच्या जीवनावर कसा परिणाम होत आहे ह्याचे विदारक चित्रणही आहे. आधी छत्तीसगडमधील नक्षलवादी संघटनेत सामील झालेली आणि नंतर त्या चळवळीतून बाहेर पडलेल्या दुडियाच्या कथनातून त्यांची हालत आपल्यासमोर उभी राहते. ती सांगते, 'एकीकडे पोलीस आणि दुसरीकडे नक्षली ह्या दोघांचा हाग्यामार. मधल्यामधे जर्मलच्या भांड्यासारखी आम्हा आदिवासींची जिंदगी चेपून जात होती. त्याच वेळी माथ्यावर सतत लोंबकळणारं फाटक्या भविष्याचं काळं आभाळ.'

'हळूहळू आमच्या पहाडात एक नवा पेच उभा राहिला. ती गळफासाची दुहेरी गाठ भारी काचू लागली. नक्षली आणि पोलीस ह्या दोघांनी गळ्याभोवती बांधलेल्या नीरगाठीत आम्हा गिरिजनांचा श्वास मात्र कोंडू लागला होता. जिंदगी नको नको होऊ लागली.'

एकेकाळी तारणहार वाटणाऱ्या नक्षलवाद्यांकडून नंतर जेव्हा 'हम करे सो कायदा'हा जुलमी फंडा उपयोगात आणला गेला तेव्हा आजूबाजूच्या गावातील संतप्त गावकरी नक्षलींच्या दहशतीविरूद्ध पेटून उठले.त्या विराट जनाआंदोलनाचे नाव 'सलवा जुडूम' असे केले गेले. गोंड भाषेत या शब्दाचा अर्थ'शांती मोर्चा' असा होतो. हा सबंध भाग मुळातून वाचण्यासारखा आहे.

नैसर्गिक संपत्तीने संपन्न असलेले हे राज्य मानवनिर्मित गंभीर समस्येला कसे तोंड देत आहे हे दाखवण्यात आले आहे.छत्तीसगडच्या बारीक सारीक गोष्टींही लेखकाच्या नजरेतून सुटलेल्या नाहीत, ज्यामध्ये आदिवासी जीवनाचे अस्सल वर्णन आणि नैसर्गिक संपत्तीच्या लुटीचे वास्तविक वर्णनही टिपलेले आहे. त्या भागातील जंगले, आबुझमाड पहाड,गातापारा, देरा टोला आणिबारह पत्ती ही तिथली गावंदेखील इतर पात्रांप्रमाणे त्यातील महत्त्वाचा भाग आहेत. लेखक स्वतः एक कथाकार आणि चित्रपट निर्माते आहेत.त्यामुळे कादंबरीची भाषा आणि त्यातील विलक्षण थरार ह्यामुळे कथा अतिशय वेगवान पद्धतीने कथा पुढे सरकत जाते. पुढे काय होईल ही उत्सुकता सतत राहते हे या कादंबरीचे खरे यश आहे. लेखकाच्या निवेदन शैलीमुळे ही कादंबरी वाचनीयझाली आहे.

**कादंबरी : दुड़िया**
**लेखकः विश्वास पाटील**
**प्रकाशकः मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस**
**मूल्यः रुपये (पेपरबैक)**

# अंतर्मुख



सुलेखा जक्कल
संपर्क क्र. ९२७००६४७२९

आधुनिक केसरी

**सुप्रसिद्ध तेलुगु कवी रोक्कम कामेश्वरराव यांच्या "अंतर्मुख"या मूळ तेलुगु काव्यसंग्रहाचा ह्या आधीच इंग्रजी, हिंदी, तामीळ व कन्नड भाषेतून अनुवाद झालेला आहे. आता ह्या मौलिक काव्यसंग्रहाचा सुंदर मराठी भावानुवाद व्यंकटेश देवनपल्ली यांनी केला आहे. अंतर्मुखमधील कविता वाचताना, रोक्कम कामेश्वरराव म्हणजे स्वतःचामार्ग स्वतःच शोधत जाणारेकवी आहेत आणि इतरांनाही आत्मशोधास प्रवृत्त करून जाणिवेच्या उच्च स्तरावर नेण्यासाठी एक बांधिलकी म्हणून स्वीकारत आहेत, हे प्रकर्षाने जाणवत राहते.**

मूलतः कविच्या भावाविष्कारात आत्म अनुभवाचे, साधनेचे आणि सत्याचे अधिष्ठान असल्याने कवीचीप्रत्येक कविता ही एका संदेशाच्या रूपात प्रकट होते. कधी ती शांतिदूत होते तर कधी प्रीतीदूत बनते. सत्यशोधनाच्या मार्गावर असलेलाकवी जीवनवृक्षाच्या मुळाशी लपलेल्या सत्य,प्रेम, शांती, करूणा, दयार्द्रता या मूल्यांशी एकनिष्ठ आहे व आत्मब्रह्माशी एकरूप झालेला आहे.परिणामी साधनेच्या आराधनेतून आलेल्या अनुभूतीचा काव्यरुपी परिपाक म्हणजे हा काव्यसंग्रह 'अंतर्मुख'!

'आनंद' या सुरेख सृजनात कवी आपली उदात्त भूमिका स्पष्ट करतो.. 'मी सदैव सत्यासोबत सत्य नेहमी माझ्यासोबत' अशी भावावस्था झाल्यावर कवीला स्वतःचेच चराचरात वसलेले विश्वव्यापी रुप उमगते. कुणी शाप दिला तरी कवीच्या हृदयातून आशीर्वादच निघतात कारण त्याच्या अंतरंगातील द्वेषाचे निर्मूलन झाले आहे आणि परम प्रेम त्याच्या अंतरी विसावलेले आहे..संकुचित मनाच्या सीमा ओलांडल्यावर,कवीच्या नजरेला सर्वत्र जाणवतो तो निजानंद! त्याला भावते आहे ती आहे जीवनाची सुंदरता! आणि काव्यातल्या प्रत्येक शब्दांततोकधी निनादत राहतो तर कधी शांततेचे, मौनाचे आणि निःशब्दतेचे अवकाश व्यापत राहतो. विकास या कवितेत कवी संकोच सोडून पूर्ण उमलण्यासाठीसुंदर संदेश देतो. "चैतन्याच्या खोलात..प्रवाहित होऊन जा..स्वतःच्या अस्तित्वाशी लयबद्ध होऊनआसमंत गंधित कर." असे सांगतो.'तडफड' या काव्यातही कवीची केंद्राच्या दिशेने वाटचाल सुरू करण्यास प्रवृत्त करणारी प्रामाणिक तळमळ दिसून येते. प्रत्येक रचना ही वाचकाला अंतर्मुख करण्यास.. आत्मपरिवर्तन घडवण्यासाठी प्रेरक अशीच आहे. इतकेच नव्हे तर अहंकार बर्फासारखा वितळायला हवा..आत्मनिष्ठ व्हायला हवे..तरच स्व-स्वरुपाचे.. कुणाशीही तुलना न करता येणारे अनुपम असे सत्याचे प्रतिबिंब दिसेल.. अन्यथा वसंत ऋतूही पाठ फिरवेल असा स्पष्ट इशारा ते देतात.काही मानवी स्वभाव दोष,विसंगती ज्या आध्यात्मिक यात्रेतील व्यवधान ठरू शकतात आणि त्यांचा निषेध करून कोणते गुण जोपासायला हवेत हे स्पष्टपणे दाखवून देतात. स्मरण या कवितेत, मन आणि वाचा एकत्र करून तुझ्या दारात उभा आहे.माझा मार्ग आणि गंतव्यस्थान.. हितचिंतक.. निकटवर्ती तूच आहेस.. तुझी एकात्मता सदैव अनुभवण्यासाठी मला आशीर्वाद दे.. प्रभूचे कधीही विस्मरण होऊ नये.. यासाठी मनोमन स्मरण करतो. भार या कवितेत निर्भार होऊन.. सतत जागरूक राहून.. जिवाशिवाचे ऐक्य होण्याच्या सूर्योदयाची कवी आतुरतेने प्रतिक्षा करतो.

ज्या विजयामुळे आत्मिक विकास, प्रगति साधली जात नाही.. आत्म्यास पोषक नसणारे.. त्याला संतोष न देणारे कोणतेही कृत्य निरर्थक आहे.. आंतरिक विजयात खरी शान आहे.. तीर्थाटन, देशाटन करूनही तुम्ही जर बदलला नसाल.. स्वतःचे स्वतः मधील अंतर मिटवले नसेल तर तो प्रवास उपयोगाचा नाही.. पण तुम्ही जर एकेक पाऊल आत्म्याच्या समीप जाल तर बाह्य जगातील दैदीप्यमान यशापेक्षाही तो विजय अर्थपूर्ण आहे असं कवी ठामपणे सांगतात.'ये ' या कवितेतून ते अस्थिर करणाऱ्या सर्व नकारात्मक भावना,अहंकार, दंभ,पांडित्य दूर सारून, बाह्य मुखवटे उतरवून.. निर्मल.. स्वच्छ.. नितळ होऊन ये असे ते आवाहन करतात. 'ज्ञानाच्या दिशेने ' या कवितेत सर्व विचारांचे.. विकारांचे विसर्जन करून.. जे संचित आहे ते फेकून रिक्त होऊन.. ते तिरोहित झाले तरच चैतन्याची चाहूल लागेल. असा संकेत कवी देतो. अस्वस्थ होऊन परिमितीमागच्या अपरिमिततेला शोधतो आहे.. आनंदाचे मूळ स्रोत शोधतो आहे.. एका महान तत्वाच्या शोधासाठी.. साक्षात्कारासाठी..'

आपल्याला गवसलेला ज्ञानाचा प्रकाश.. इतरांची जीवनावस्था उन्नत करण्यासाठी वाचकासाठी कवीची काव्यरुपाने ही एक अनुपम भेट आहे. मूळ काव्यातील अर्थगर्भ आशय, विवेक देणारा विचार ह्यांना कुठेही धक्का न लावता, प्रत्येक कविता ही शब्दांतील प्रासादिकता साधतसुरेख अनुवाद केल्यामुळे आपण मूळ तेलुगु कविता न वाचता 'अंतर्मुख' हा मूळ मराठी




काव्यसंग्रह वाचत असल्याचा प्रत्यय येतो, हे अनुवादकाचे खरे यश आहे. कवितांमधूनसत्य शिव सौंदर्याच्या अलौकिक तत्वांना स्पर्श करणारा हा काव्यसंग्रह वाचनीय आहे.. प्रत्येक रचना ही प्रबोधनाचा ज्ञानदीप प्रज्वलीत करते. प्रत्येक काव्यातील अर्थसौरभ.. अनुभूतीच्या आत्मगंधाने गंधाळलेला आहे. आत्मशोधातून कवीला गवसलेला आत्मबोध.. अंतरी उमललेले पूर्णत्वाचे ब्रह्मकमळ प्रत्ययास येते. त्यांचे जीवन प्रार्थनामय झाले आहे.. अज्ञाताची साद त्यांना ऐकू येते आहे. सर्व विकारांचा निचरा झाल्यावरच विवेकाचा.. सत्याचा उगम होतो. कवीने जे अनुभवले आहे, ते विश्वकल्याणासाठी मर्यादेच्या पलीकडचे आहे, अनाकलनीय आहे.. ते काव्यरुपात गुंफले आहे. या अंतर्गामी प्रवासाची सुरुवात करण्यासाठी प्रथम पाऊल उचलण्याची प्रेरणा कवी देतो. सत्यशोधनास भावपोषक अशा दिव्य पातळीवर हा काव्यसंग्रह नेतो..

अंतर्मुख हा काव्यसंग्रह आहे .. असे न वाटता ती काव्ययात्रा होते.. सार्थकतेचा यथार्थ बोध देत.. परिघाकडून केंद्रासमीप नेत.. कवीची तीच अभिप्सा आहे.. तोच ध्यास आहे.. जोपर्यंत श्रोते आहेत तोपर्यंत कवी त्यांना सांगत राहणार आहे असे 'एक सांगायचे आहे' या कवितेत कवीम्हणतो.

जनमानसाचा पारमार्थिक प्रवास सुकर.. सुखद व्हावा या उद्देशाने अवतरलेले काव्यधन वाचकांचे आत्मवैभव वाढवणारे आहे. भ्रमित, श्रांत मनास प्रशांतीचा समृध्द अनुभव देण्यासाठी नेमके प्रबोधन कवीने 'अंतर्मुख' या काव्यसंग्रहातून केले आहे.कवीची संवेदनशीलता, भावोत्कटता तितक्याच उत्कटतेने अनुभवून अंतरंगातून बाहेर मराठी माध्यमातून अवतरलेली कवितेला केवळ अनुवाद म्हणता येणार नाही, ती प्रक्रिया म्हणजे एक प्रकारचे अनुसृजनच होय. त्यात अनुसृजक देवनपल्ली यांची साहित्यिक प्रातिभ दिसून येते.

काही कविता समजून घेताना पुन्हापुन्हा वाचाव्या लागतात.. आणि त्यातून नवीन असं काहीतरी गवसत जातंत्यामुळेआध्यात्मिक विचारधनकाव्यरुपात मांडणेतसे अवघडच. त्यातही त्या अनुभवाशी तादात्म्य पावून त्या काव्याचा अनुवाद करणे हे तर अधिकच दुष्कर. अनुवादक व्यंकटेश देवनपल्ली हे प्रथितयशसाहित्यिक असून वाचकांची मने जिंकणारे कथालेखक आहेत, कादंबरीकार आहेत,चरित्रकार, अनुवादक आणि समीक्षक आहेत. त्याचबरोबर तेएक संवेदनक्षम कवी असल्याचेहीत्यांच्या यापूर्वीच्या "आमुक्तमाल्यदा"सारख्या तेलुगु काव्यप्रबंधनाच्या मराठी आणि हिंदी गद्यानुवादातून जाणवले आहे.अंतर्मुखच्या मराठी उत्कृष्ट अनुवादाला अनुवादकर्त्यांचे सखोल आध्यात्मिक चिंतनही पोषक ठरल्याचे दिसून येते. त्यामुळेच कवितेतील स्वतंत्र विचारांना.. मध्यवर्ती कल्पनेला प्राथमिकता देऊन हा ओघवता अनुवाद केला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

प्रा. बी.एन. चौधरी यांची या काव्यसंग्रहाला लाभलेली प्रस्तावना म्हणजे एक अनमोल दागिना आहे. पुस्तकाचे देखणे मुखपृष्ठ विषयाला अनुरूप असेच आहे.

**अंतर्मुखः काव्यसंग्रह**
**मूळ कवी: रोक्कम कामेश्वरराव**
**मराठी अनुवादः व्यंकटेश देवनपल्ली**
**प्रकाशनः स्वरूपदीप प्रकाशन, सोलापूर**
**मूल्यः रू. १५०/-**

# सर्वात मोठे शस्त्र

आधुनिक केसरी

एक दिवस, अकबरने बिरबलला विचारले - ' बिरबल, पूर्ण विश्वात कोणाची संख्या अधिक आहे, जे लोक बघु शकतात त्यांची की जे अंध आहेत त्यांची ?' बिरबल बोलला, 'महाराज! यावेळेला आपल्या प्रश्नाचे उत्तर देणे मला शक्य नाही परंतु मला पूर्ण विश्वास आहे की, विश्वात बघु शकणाऱ्यांपेक्षा अंधाची संख्या अधिक असेल.'

अकबरने बिरबलला सांगितले, 'तुला तुझे म्हणणे सिध्द करावे लागेल. बिरबलने हसत हसत अकबरचे आव्हान स्वीकारले. दुसऱ्या दिवशी, बिरबल बाजाराच्या मधोमध एक न विणलेली लाकडी खाट घेऊन बसला आणि ती विणायला सुरूवात केली. आजूबाजूला दोन माणसं कागद व पेन घेऊन बसली होती. इथे काय होत आहे ते बघण्यासाठी थोडया वेळात तिथे गर्दी जमु लागली. तिथे उपस्थितीत असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने बिरबलला एक प्रश्न विचारला, 'बिरबल तुम्ही हे काय करत आहात ?' बिरबलच्या दोन्ही बाजूला बसलेले माणसं असा प्रश्न विचारणाऱ्यांचे नाव विचारून ते लिहित होते. जेव्हा अकबरला ही गोष्ट समजली की बिरबल भर रस्त्यात खाट विणत आहे, तेव्हा लगेच अकबरही तिथे पोचला व त्यानेही तोच प्रश्न विचारला - हे तू काय करत आहेस ? अकबरच्या प्रश्नाचे काहीही उत्तर न देता बिरबलने आपल्या बाजूला बसलेल्या एकाला बाहशहा अकबरचे नाव लिहिण्यास सांगितले. तेव्हा अकबरने त्या माणसाच्या हातातील कागदाचा गठ्ठा घेतला. त्यावर लिहिलेले होते - 'अंध लोकांची यादी.' अकबरने बिरबलला विचारले, 'या यादीत माझे नाव का लिहिले आहे ?' बिरबल बोलला, 'महाराज! आपण बघितले की मी खाट विणत आहे, तरीपण तुम्ही मला प्रश्न केला की - मी काय करत आहे ?' अकबरने बघितले की बघु शकणाऱ्या लोकांच्या यादीत एकही नाव नव्हते, याउलट अंध लोकांची यादी पूर्ण भरलेली होती. बिरबल बोलला, 'महाराज! आता तर तुम्ही माझ्या बोलण्याशी सहमत असाल की विश्वात अंधांची संख्या जास्त आहे.' बिरबलच्या या चतुराईवर अकबरने स्मितहास्य केले.

# थकवा दूर करण्यासाठी

आधुनिक केसरी

1. नारळ पाणी -दिवसभर ताजेतवाने राहण्यासाठी नारळ पाणी पिणे हा आरोग्याच्या दृष्टीकोनातून एक उत्तम आणि पौष्टिक असा पर्याय आहे. नारळाच्या पाण्यात प्रचंड प्रमाणात मिनरल्स असतात. यामुळे आपल्या शरीरातील ऊर्जेचा स्तर वाढण्यास मदत होते. दिवसाची सुरुवात करताना नारळ पाणी प्यावे. पण यामध्ये कोणत्याही अन्य साम्रगी मिसळू नये.
2. भाज्यांचा रस - आपल्या दिवसाची सुरुवात करताना भाज्यांचा रसाचे सेवन करावे. विशेषतः हिरव्या पालेभाज्यांचा यामध्ये समावेश करावा. पालक, पुदीना यांसारख्या हिरव्या पाल्यांचा ज्यूस प्यायल्यास थकवा जाणवत नाही. 3. गोजी बेरी -गोजी बेरी फळामध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन्स, मिनरल्स, अॅन्टीऑक्सिडेंट्स आणि 8 प्रकारचे अमिनो अॅसिड असतात. नियमित स्वरुपात गोजी बेरीच्या एका ग्लासाचे सेवन केल्यास थकवा आणि तणाव दूर होण्यास मदत मिळते. 4. लिंबू पाणी - सकाळी तुम्ही लिंबू पाणी पित असाल, तर तुमचे संपूर्ण शरीर दिवसभर ताजेतवाने राहते. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी आणि अॅन्टीऑक्सिडेंट्स भरपूर प्रमाणात असल्यानं शरीरात रोगप्रतिकारकशक्ती वाढण्यास मिळते. 5. ग्रीन टी -ग्रीन टीच्या सेवनाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. ग्रीन टीमुळे शरीरातील मेटाबॉलिझम चा स्तर वाढण्यास मदत होते आणि फॅट्सही बर्न होतात.
6. कोरफडीचा ज्यूस - सकाळच्या वेळेत कोरफडीचा ज्यूस प्यायल्यास शरीरातील टॉक्सिन्स बाहेर पडण्यास मदत होते. कोरफडीच्या गरामध्ये पाण्याचे प्रमाण भरपूर असते.

# जेएनपीव्ही आर.के.एफ. प्रशासनाच्या विरोधात पालकांचे गेट बंद आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज




**उरण :** उरण तालुक्यातील जे एनपीए वसाहतमध्ये कार्यरत असलेल्या आर.के. एफ- जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय शेवा या संस्थेच्या मनमानी व एकतर्फी कारभाराविरोधात लोकशाही व कायदेशीर मार्गाने वरिष्ठ पातळीवर व संबधित विभागांना पत्र व्यवहार करून देखिल विद्यार्थी व पालकांच्या समस्या सूटत नव्हत्या. शिक्षक, पालक विद्यार्थ्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. आर.के एफ शिक्षण संस्थेच्या निष्क्रीय व मनमानी कारभाराचा निषेध करण्यासाठी व शिक्षक, पालक, विदयार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पालक संघर्ष समितीतर्फे मंगळवार दि 4 जुलै 2023 रोजी सकाळी 8 वाजल्यापासून आर.के.एफ जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालय शेवा ( जेएनपीए )च्या गेटसमोर शिक्षक, पालक, विद्यार्थ्यांनी गेट बंद आंदोलन केले.

आर के एफ प्रशासनाच्या प्रशासकीय अधिकारी श्रीमती पूजा अंजनीकर यांचे त्वरीत निलंबन करावे. 3 वर्षापासून ज्या शाळेत इमारतीमध्ये जे वर्ग भरत होते तेच पूर्ववत करावे.इयत्ता 8 वी ते 10 वी मराठी माध्यमिक विदयार्थ्यांना शासनाकडून आलेला अनुदान शाळेने घ्यावा व पालकांच्या मुलांची फी पूर्णपणे माफ करावी. शिक्षकांना शासनाच्या नियमाप्रमाणे पूर्ण वेतन मिळावे. अशा विविध मागण्यासाठी पालक संघर्ष समिती च्या माध्यमातून पालक संघर्ष समितीचे अध्यक्ष किरण घरत व शिक्षक नेते नरसु पाटील यांच्या नेतृत्वाखाली आर.के.एफ

शाळेसमोरा गेट बंद आंदोलन करण्यात आले. सदर आंदोलनाची दखल घेत,आरके एफ प्रशासनाने त्वरित पालकांना चर्चेसाठी शाळेत बोलाविले.विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी,पालक, शिक्षक व आरकेएफ प्रशासन यांच्यात बैठक झाली. बैठकीत माजी आमदार मनोहरशेठ भोईर,जेएनपीएचे विश्वस्त दिनेश पाटील ,शिक्षक नेते तथा उद्योजक नरसु पाटील,ज्येष्ठ साहित्यिक एल. बी. पाटील, उरण विधानसभा संपर्क प्रमुख महादेव घरत, महिला अध्यक्ष रेखा घरत, ॲडवोकेट रत्नदिप पाटील,तुषार घरत, किरीट पाटील , कामगार नेते सुरेश पाटील, कामगार नेते रवि घरत रमाकांत म्हात्रे, मुख्याध्यापक रमाकांत गावंड, मुख्याध्यापक गिरीश पाटील, मुख्याध्यापक प्रमोद कांबळे आदी मान्यवर तसेच पालक संघर्ष समितीचे अध्यक्ष किरण घरत, उपाध्यक्ष अमर म्हात्रे, उपाध्यक्ष रेखा ठाकूर, कार्याध्यक्ष योगेश तांडेल, पालक सदस्य -विश्वास पाटील, अजय खाडे, लिलेश्वर ठाकूर, अविनाश म्हात्रे, रंजना म्हात्रे, प्रियदर्शनी म्हात्रे, पल्लवी जोशी, जागृती ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांच्या मागणीबाबत सविस्तर चर्चा झाली, जे.एन. पी.एचे विश्वस्त दिनेश पाटील यांनी पूजा अंजनीकरची त्वरीत उचलबांगडी करावी, त्यांचे निलंबन करावे अशी मागणी केली. शिक्षक नेते नरसु पाटील यांनी शिक्षण क्षेत्रासारख्या पवित्र क्षेत्राचे बाझार करू नका. शिक्षण क्षेत्रातील पावित्र्य जपा. शिक्षक, पालक विद्यार्थ्यांना न्याय दया. अशी भूमिका घेतली.तर जेष्ठ साहित्यिक तथा रायगड भूषण एल. बी. पाटील यांनी शाळेचा दर्जा घसरू देऊ नका.शाळेत बीयरची जाहिरात करणा-या पूजा अंजनीकर यांच्यावर कारवाई करा. तीन-तीन महिने शिक्षकांना पगारावाचून वंचित ठेवले तसे करू नका. शिक्षकांना वेळेवर पगार दया.असे सुचविले. तर महादेव घरत यांनी शिक्षक पालकांच्या मागण्या, सूचना प्रशासनाने विचारात घ्या. शाळेला पूर्वीची शिस्त लावा.अशी मागणी केली तर रेखा घरत यांनी महिलांवर कोणताही अन्याय होणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी अशी मागणी केली. स्थानिक भूमीपुत्रांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय खपवून घेणार नाही असा आक्रमक पवित्रा यावेळी माजी आमदार मनोहर भोईर यांनी बैठकीला दरम्यान घेतला. उपस्थित सर्व मान्यवर व पालक संघर्ष समितीने घेतलेल्या आक्रमक भूमिकेसमोर नमते घेत आरकेएफ जवाहरलाल पोर्ट विद्यालय शेवा प्रशासनाने पालकांच्या, विद्यार्थ्यांच्या शिक्षकांच्या सर्व मागण्या मान्य केल्या. पालकांच्या शिक्षकांच्या मागण्या मान्य झाल्याने गेट बंद आंदोलन स्थगित करण्यात आले.पालकांनी, शिक्षकांनी गेट बंद आंदोलनास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पाठिंबा दिलेल्या सर्व मान्यवरांचे व मागण्या मान्य होण्यासाठी प्रयत्न करणा-या सर्वांचे आभार मानले. आर के एफ जवारहलाल पोर्ट विद्यालय शेवा या विद्यालयात अनेक चुकीच्या व बकायदेशीर गोष्टी सुरु होत्या. आता सर्वच मागण्या मान्य झाल्याने आरकेएफ जवाहरलाल पोर्ट विद्यालय शेवा या विदयालयातील चूकीच्या व बेकायदेशीर गोष्टींना आळा बसणार असल्याने शिक्षक, पालक, विदयार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# सोयगाव शेतकऱ्यांनो, ई-पीक ॲपवर नोंदणी करा : तहसीलदार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात असलेले सर्व शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२३ पीक पाहणी नोंदणीसाठी ई-पीक पाहणीचे २.०.११ हे अपडेटेड व्हर्जन गूगल प्ले- स्टोअरवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तरी सर्व खातेदार शेतकऱ्यांनी नवीन व्हर्जन अपडेट करून घेणे असे आवाहन तहसीलदार रमेश जसवंत तथा तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी केले आहे.

खरीप हंगामाच्या प्रत्यक्ष ई-पीक पाहणी मोबाइल ॲपद्वारे पीक पाहणी करण्यासाठी १ जुलै २०२३ पासून सुरू करण्यात येत आहे. तरी सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२३ दिलेल्या साठी कालावधीमध्ये आपली ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी. जेणेकरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यास अडचण येणार नाही.ई-पीक पाहणी प्रकल्प, महाराष्ट्र राज्याच्या ई-पीक पाहणी मोबाईल ॲपच्या सहाय्याने सर्व खातेदार शेतकन्यानी तलाठ्याकडे न जाता स्वतःच्या मोबाईलवरून आपल्या ७/१२ वर विविध पिकांची नोंदणी करता येणे शक्य झाले आहे. महसूल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प १५ ऑगस्ट २०२१ पासून महाराष्ट्रात राज्यभर राबविण्यात येत आहे. या ॲपमध्ये आतापर्यंत सुमारे १.८८ कोटीपेक्षा अधिक शेतकऱ्यानी रेजिस्ट्रेशन केलेले आहे व आपल्या पिकांची नोंदणी केली आहे...खरीप हंगाम २०२३ पीक पाहणी नोंदणीसाठी ई-पीक पाहणीचे २.०.११ हे अपडेटेड व्हर्जन गूगल प्ले स्टोअर वर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तरी सर्व खातेदार शेतकऱ्यांनी नवीन व्हर्जन अपडेट करून घेणे आवश्यक आहे. खरीप हंगामाच्या प्रत्यक्ष ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी करण्यासाठी ०१ जुलै २०२३ पासून सुरु करण्यात येत आहे.तरी सोयगाव तालुक्यातील सर्व शेतकरी बंधु-भगिनींना अवाहन करण्यात येते कि त्यांनी खरीप हंगामा २०२३ साठी दिलेल्या कालावधीमध्ये आपली ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी जेणे करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यास अडचण येणार नाही. असे हि तहसीलदार रमेश जसवंत व मदन सिसोदिया तालुका कृषी अधिकारी यांनी बोलताना सांगितले.

# चार्टड अकाऊटंट्च्या परीक्षेत रिजवान शेख उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरीचे



संचालक डॉ.ए.एच.शेख यांच्या सुकन्या रिजवान शेख या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये घेण्यात आलेल्या परिक्षेत शेवटच्या वर्षाच्या अभ्यासक्रमात पहिल्याच टर्म मध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या आहेत. रिजावन शेख यांनी त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांचे वडील डॉ.ए.एच.शेख व त्यांच्या आईंना दिले आहे. रिजावन शेख यांच्या या यशाबद्दल त्यांच्या नातेवाईक मित्रपरिवार व हितचिंतकांनी अभिनंदन करुन त्यांच्या पुढील कारर्किदीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पाच लाखांचा चेक न दिल्यास मुख्यमंत्र्यांसमोर आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मेणबत्ती ( स्फोटक ) पदार्थ तयार करणाऱ्या कारखान्यात मृत्युमुखी पडलेल्या वारसाना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पाच लाख रुपये जाहीर केले परंतु एक लाखाचा चेक देऊन मृतांच्या नातेवांची चेष्टा करण्यात आली असा आरोप मयत व्यक्तीच्या नातलगांनी केला आहे.

दिनांक 18/04/2023 रोजी वासखेडी गावाच्या हद्दीत सुरु असलेला स्फोटक पदार्थ बजविण्याचा कारखान्यात स्फोट होवून महिला यात मृत्युमुखी पडलेल्या आहेत. घटना किती भयंकर व हृदयद्रावक होती मी स्वतः जिल्हाधिकारी यांनी घटनास्थळी पाहणी केली आहे. सदर खटला हा शासनाने फास्टट्रैक कोर्टात चालवावा व ज्यांनी पाच घराचा विध्वस केला आहे आरोपी ना जलद व कठोर शासन करावे, तसेच या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या इसमाच्या नातेवाईकांना माननीय मुख्यमंत्री यांनी प्रत्येकी 5 लाख रूपयाची मदत जाहीर केलेचे सामन्यात आले होते. मात्र बुधवार दि ५ रोजी मृतांच्या नातेवाईकांला प्रत्येकी एक लाख रूपयाचे फक्त चेक देण्यांत आले आहेत. काहींचे घरातील मुख्य व्यक्ती तर काही घरातुन लहान मुलांच्या आईचा या दुर्घटनेत मृत्यू झालेला आहे. संसार उघडयावर आले आहेत. अत्यंत बिकट परिस्थिती या पाचही परिवारां मध्ये निर्माण झाली आहे.

येत्या 10 तारखेला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उप मुख्यमंत्री हे शासन आपल्या व्दारी कार्यक्रमासाठी जिल्हयात येत आहेत. आमच्या वरिल मागण्या व मदतीची रक्कम तात्काळ देण्यात यावी असे मागनि नातेवाईकांनी केली आहे अन्यथा 10 तारखेला 1 लाखाचा चेक फाडून आंदोलन छेडण्यांत येईल असा इशारा या ठिकाणी देण्यात आला.






# विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य बाळगावे

## माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील संविधान युवा मंच वैजापूर यांच्या पुढाकाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती एक वही एक पेन अभियान राबविण्यात आले होते. संकलित केलेले वही पेन मदर तेरेसा वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी,माजी उपनगराध्यक्ष अकील शेख तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे शहराध्यक्ष दिनेश राजपूत,नगरसेवक शैलेश चव्हाण,वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक प्रशांत त्रिभुवन,काँग्रेस चे अनुसूचित जाती जमाती तालुकाध्यक्ष साहेबराव पडवळ,सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवडे , प्रा.आबासाहेब कसबे,समता परिषदेचे पुंडलिक गायकवाड, संतोष त्रिभुवन, राजवीर त्रिभुवन मदर तेरेसा वसतिगृहाचे संचालक अण्णासाहेब ठेंगडे आदींच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संविधान युवा मंचचे अध्यक्ष जीवन पठारे,कार्याध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, सचिव लहानू त्रिभुवन, उपाध्यक्ष राहुल त्रिभुवन,श्रीकांत जाधव, प्रवीण शिंदे,ऋषिकेश त्रिभुवन, अंकुश त्रिभुवन,राहुल त्रिभुवन विशाल त्रिभुवन आदींनी परिश्रम घेतले. या प्रसंगी साहेबराव पडवळ,कृ. उ. बा. संचालक प्रशांत त्रिभुवन, प्रा. कसबे, सहाय्यक पोलीसनिरीक्षक विजय नरवडे आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रमोद पठारे यांनी केले.



# माणुसकी समूहाने मनोरुग्ण महिलेला केले उपचारासाठी दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**पडेगाव :** येथे राहणाऱ्या एक मानसिक रुग्ण महिलेने क्रांती चौक पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अक्षरश धुमाकूळ घातला होता. तेथील जाणाऱ्या येणाऱ्या पादचाऱ्यांना शिवीगाळ करणे, आरडाओरडा करणे, त्यांचा चावा घेणे आणि रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा निर्माण करणे अशा संदर्भातली तक्रार स्थानिक नागरिकांकडून क्रांती चौक पोलिसांना प्राप्त झाली होती. तेव्हा तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी सदर महिलेची रवानगी छावणी पोलीस स्टेशन येथे केली. तिथे त्या महिलेची चौकशी केल्या असता तिला एक मुलगी असून ती मानसिक रुग्ण असल्यामुळे तिच्या नवऱ्याने तिला घटस्फोट दिलेला आहे. तिला वडील आणि भाऊ आहेत. तिची आई ही वारलेली आहे. ती सध्या पडेगाव येथे वडिलांच्या सोबत राहते. तिने छावणी पोलीस स्टेशन येथे प्रचंड धुमाकूळ घातला. तेथील पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांनी सु-लक्ष्मी बहुद्देशिय सेवाभावी संस्था आणि माणुसकी समूहाचे प्रमुख सामाजिक कार्यकर्ते सुमित पंडित यांना ही बाब सांगितली. त्यानंतर सुमित पंडित यांनी पोलिसांच्या मदतीने सदर महिलेला घाटी रुग्णालयात आणून तिथे मानसोपचार विभागात डॉक्टरांना दाखवल्यानंतर डॉक्टरांनी ती मानसिक रुग्ण आहे म्हणून सांगितले. तसेच तिच्या काही वैद्यकीय चाचण्या घेतल्या. पोलिसांच्या मार्फत न्यायालयासमोर तिला दाखल करण्यात आले.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी कोर्ट नंबर 16, औरंगाबाद शहर यांनी तिच्या सर्व कागदपत्रांची तपासणी करून तिला पुनर्वसनासाठी आणि पुढील औषध उपचारासाठी मानसिक रुग्णालय येरवडा पुणे येथे दाखल करण्याचे आदेश दिले. माणुसकी समूहाने ह्या महिलेला छावणी पोलीस स्टेशन येथील पोलिसांच्या मदतीने येरवडा पुणे येथे दाखल केले. यासाठी पोलीस निरीक्षक कैलास देशमाने, सहाय्यक पोलीस निरीक्षक भागिले, पोलीस उपनिरीक्षक डाके, अवघड,प्रीती फड, पोलीस हवालदार दिलीप जाधव, मंगेश शिंदे, मीना जाधव, माणुसकी समूहाचे सुमित पंडित पूजा पंडित, बोधि संस्थेचे डॉ रंजना दंदे यांचे या कामी सहकार्य लाभले.

मनोरुग्णांसाठी काम करणे सोपे नाही माणुसकी समुहाची पोलीसांना होतीय मदत..

याप्रकरणी पोलीस निरीक्षक छावणी पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, औरंगाबाद शहरांमध्ये मनोरुग्ण तसेच सिग्नलवर किंवा विविध भागांमध्ये भीक मागणारे यांचे प्रमाण सध्या खूप वाढलेले आहे. दोन वेळचे जेवण फुकट मिळते म्हणून बऱ्याचशा लोकांना घाटी रुग्णालयामध्ये पण आणून सोडल्या जात आहे. आज आपण एवढ्या विकासाच्या तंत्रज्ञानाच्या गोष्टी करत असताना, अशा घटना माणुसकीला काळिमा फासणारे आहेत. तसेच माणसांमधला माणुसकीचा झरा आटत चाललाय असे दिसते.देशमाने साहेब असे म्हणाले की, स्वतः यांची जवळचे नातेवाईक यांना रस्त्यावर सोडून देतात आणि यांना बेघर, बेसहारा करतात. एक सामाजिक बांधिलकी म्हणून समाजातल्या घटकांनी समोर येऊन या लोकांच्या पुनर्वसनाची जबाबदारी घेतली पाहिजे.

# ३३ केव्ही उपकेंद्राला पावसाची अलॅर्जी : मा.सभापती चव्हाण

## अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने ऐन पावसाळ्यात थीकटींगचे काम

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे महावितरण कंपनीचे ३३ केव्ही उपकेंद्र असून या उपकेंद्राला पंचवीस ते तीस गावे जोडण्यात आले आहे.परंतू या महावितरण उपकेंद्राला कोणाचे अभय आहे यांना काहीच धाकच राहिलेले नाही लाईन सुरुळीत करा नुसता आम्ही उपसणाला बसणार असे लेखी निवेदन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या दिले आहे. थोडी पाऊसाची सुरुवात झाली की डाभा,नादांगाव, नांदा तांडा, मोलखेडा,घाणेगाव तांडा,चारुतांडा, देवळगाव गुजरी लाईट बंद करतात कधी कधी सावळदबारा बंद करून टाकतात आणि ऐन उन्हाळ्यात थीकटींगचे कामे पावसाळ्यात काढतात तर हे कर्मचारी उन्हाळ्यात झोपा घेता का अशे लेखी निवेदन उपोषणाला बसणार असे कृषीमंत्री यांच्याकडे दिले आहे. बसणार लाईट गुल दि.४/७/२३ वीस दि.५/७/२३ ला पंधरा तास लाईट गुल झाली होती.

फोन केला असता वायरमन सांगतात की थीकटींगचे कामे चालू आहे असे सांगतात यांना कोणाचा धाक राहिलेला नाही असे दिसून येत आहे. सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरात दुर्गम ग्रामीण भागातील असलेली गावे असा सुमारे अठरा ते वीस गावांचा वीज पुरवठा गेल्या दोन दिवसांपासून काही कारण नसताना खंडित झाल्याने वीज ग्राहक पुरते हैराण झाले आहेत. दरवर्षी सावळदबारा महावितरणचे दुर्लक्ष होत असल्याने अशा प्रकारे अनेक दिवस वीज प्रवाह खंडित होत असतो, असा आरोप सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केला आहे.गुरुवार ०४ व ०५ जूलै रोजी या पूर्ण गावांचा वीज पुरवठा खंडित झाला असुन, गेले चाळीस तास उलटून गेले तरी विज प्रवाह सुरू झाला नसल्याने या परिसरातील ग्रामस्थ हैराण झाले आहेत. अनेक वेळा सावळदबारा महावितरणच्या कर्मचाऱ्यांना फोन केला असता, एक तासात दोन तासात लाईट येईल असे सांगत असून चाळीस तास उलटून गेले तरी वीजेचा पत्ता नाही, अशी माहिती मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली.

ही गावे अत्यंत दुर्गम डोंगर भागात वसलेले असल्याने महावितरण या गावांच्या वीज पुरवठ्याकडे नेहमीच दुर्लक्ष करीत असल्याने गावांतील ग्रामस्थांना नेहमीच अंधारात रहावे लागते. याकडे तातडीने लक्ष देऊन या ठिकाणच्या गावांचा नेहमीच विज पुरवठा खंडीत होत असलेला सुरळीत करावा,असे लेखी निवेदन मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या कडे दिले आहे.

# शिवसेना शहरप्रमुखपदी डॉ. सदाशिव पाटील

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** येथे शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) गटाच्या कन्नड शहरप्रमुखपदी डॉ. सदाशिव पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व आ उदयसिंग राजपूत यांनी एका पत्राद्वारे ही नियुक्ती केली असून, पक्षवाढीसाठी नेटाने व जिद्दीने काम करत, शहर व परिसरातील तळागाळातील लोकांपर्यंत शिवसेना पक्षप्रमुख उध्दवजी ठाकरे यांची विचारधारा पोहचवून सर्व सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डॉ. सदाशिव पाटील यांनी कन्नड नगरपालिकेत उपनगराध्यक्ष, म्हणून काम केले असून, सर्व स्तरातील सर्वसामान्यांपर्यंत त्यांची कार्यशैली जुळलेली आहे. त्यांचे संघटन कौशल्य, शिस्तबद्धता उत्तम असून सर्व सामान्यांच्या मदतीसाठी केव्हाही धावून जाण्याची त्याची तयारी वाखाणण्याजोगी आहे. त्यांना शहरप्रमुखपदी नियुक्त करून पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना न्याय दिला असल्याची भावना शहरभर व्यक्त होत आहे.

या निवडीबद्दल त्यांचे शिवसेनेचे नेते तथा माजी खा. चंद्रकांत खैरे, आ. उदयसिंग राजपूत जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड, डॉ. एस. जे. जाधव , तालुकाप्रमुख संजय मोटे, सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# अविनाश परदेशी हत्याकांडातील मुख्य आरोपीस अटक नाही म्हणून टोकाचे पाऊल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अविनाश बन्सीलाल परदेशी या तरुणाचा मृत्यू झाला याबाबत पश्चिम देवपूर पोलीस स्टेशन येथे आरोपींवरती खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता या प्रकरणातील मुख्य आरोपी सागर सुनील कांबळे अद्याप फरार असून त्यास अटक न करता पोलीस प्रशासन गेल्या 9 महिन्यापासून प्रत्यक्षपणे अटक व्हावी याकरिता कोणत्याही पद्धतीने प्रभावी प्रयत्न होताना दिसत नाही असा आरोप तक्रारदार भूषण पाटील यांनी केला आहे. उलट माझ्या जीवितास धोका असताना मला पोलीस संरक्षण नाकारून प्रशासनाचे आरोपींना सहकार्य केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

आरोपी मला संपवण्याचा कट रचत असून ही बाब वेळोवेळी पोलीस प्रशासनाच्या मी लक्षात आणून देखील पोलीस प्रशासन त्याकडे कानाडोळा करीत आहे त्यामुळे आरोपींना मला संपवण्याचा कट करण्यास व कट अमलात आणण्यास जिल्हा पोलीस प्रशासनाचे अप्रत्यक्षपणे पाठबळ मिळत असल्याचे मला वाटते या बाबी गंभीर असून माझ्या जीविताचे काही बरे वाईट होऊ शकते असे सांगून मंत्री महोदय यांच्या गाडीसमोर अंगावर पेट्रोल टाकून मंत्रालयात आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला व अदखलपात्र गुन्हा देखील दाखल करण्यात आला असून पोलीस प्रशासनाने लेखी नोटीस देऊन भूषण पाटील यांना सोडले.

आरोपी सागर कांबळे याला लवकरात लवकर अटक करणे व मी मागितलेले पोलीस संरक्षण मला तात्काळ मिळावे या मागण्या आठ दिवसात मान्य न झाल्यास मला पुन्हा टोकाचे पाऊल उचलावे लागेल असा इशारा देखील दिला आहे.



# कन्नड येथे जनशक्ती संघटनेचे कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर बोंबाबोंब आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अतुल खूपसे यांच्या आदेशाने अनिल शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विजय वाघ जिल्हाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली अशोक पवार यांच्या सहकार्याने कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड येथील बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. यावेळी कुषि उत्पन्न बाजार समिती मध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी ग्रामीण भागात शेतकरी बॅकेकडुन व सावकाराकडुन व्याजाने पैसे घेऊन आपल्या शेतात कुटुंबासह रात्र न दिवस राबुन कपाशी मक्का आद्रक, तुर, गहु, सोयाबिन ,बाजरी ईतर पीक उत्पन्न तयार करून विक्री साठी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये घेऊन येतो परतु व्यापारी शेतकऱ्यांचा मालाला भाव देत नाही शासकीय हामी भावा प्रमाने खरीदी करीत नाही. व्यापारी मनमानी भावाने शेतकऱ्यांकडून माल खरेदी करून लुटमार करतो करीता शेतकऱ्यांच्या मालाच भाव फलक लावण्यात यावे लिलाव मध्ये मालाला जो भाव जाहिर होतो त्या भावा प्रमाणे पावती व पैसै देत नाही. मनमानी भावा प्रमाणे एक मालाचे जागेवर लिलाव करून जागेवर पैसे देण्यात यावे इत्यादी मागणी साठी जनशक्ती संघटनेकडुन बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले.



# अर्जंट फ्लॅट विकणे आहे

नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.

संपर्क : मो. 7588818406



# १ लाख २० हजारांचा चोवीस किलो गांजा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**जत/सांगली :** जत तालूक्यातील संख मधून ऊसात लावलेली गांजाची झाडे सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व उमदी पोलिस ठाण्याच्या संयुक्त कारवाईत जप्त करण्यात आली. यामध्ये ऊसात ७ ते ८ फुटाची गांजाची झाडे हस्तगत करण्यात आली आहेत. या २४/किलो गांजांची किंमत बाजारपेठेत अंदाजे 1 लाख 20 हजार पर्यंत असून कारवाईत राजेंद्र शिवाण्णा बिरादार, श्रीकांत शिवाण्णा बिरादार, शटगोंडा शिवाण्णा बिरादार सर्व रा. संख ता. जत अशी अटक करण्यात आलेल्यांची नावें आहेत.

सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून श्री सतीश शिंदे व उमदी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप शिंदे यांनी ही कारवाई केली. उमदी पोलिस ठाण्याचे नुतन सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप शिंदे यांनी पदभार स्विकारल्यानंतर अवैद्य धंदे वाल्यांवर कारवाईचा धडाका लावला असून उमदी पोलिस ठाणे अंतर्गत येणाऱ्या सर्व अवैद्य धंद्यावाल्यांचे मुसक्या आवळण्यास सुरूवात झाली आहे.

# सरंक्षक भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे

## भ्रष्ट अधिकाऱ्यांचा आशीर्वादामुळेच गुत्तेदारासह कर्मचाऱ्याची अरेरावी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात असलेल्या उमरावती शिवारात गट क्रमांक ४९५ मध्ये वन विभागातर्फे सुरू असलेल्या तार कंपाउंडचे निकृष्ट दर्जाचे हे काम अधिकाराच्या उपस्थित सुरू असल्याने ग्रामस्थ व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना गुत्तेदाराची मनमानी उत्तरे सुरू असल्याने संबंधित कामाची चौकशीची मागणी करण्यात येत आहे. वनविभाग परिक्षेत्र सिल्लोड अंतर्गत असलेल्या उमरावती तालुका फुलंब्री येथील गट क्रमांक ४९५ या डोंगराळ भागाला लागून असलेल्या वन विभागाच्या परीक्षेत्र भागात पशुपक्षी व वन्यजीव यांचे संरक्षण करता यावे . वनात कुणी शिकारी साठी जाऊ नये किंवा जंगली जनावरे , प्राणी हे परिसरातील शेतकऱ्याच्या पिकात जाऊन त्यांच्या कडून पिकांचं होणारे नुकसानी टाळत्या याव्यात आणि या बाबत तक्रारी वाढल्याने या वनविभाग परिसरात सिमेंट पोलसह तार कंपाउंडचे काम सुरू असून सदरील काम एकदम निकृष्ट दर्जाचे असून या कामाची गुणवत्ता दर्जा घसरलेला असल्याने संबंधित काम थांबवण्याची मागणी ग्रामपंचायत उमरावतीच्या वतीने केली असता तुम्ही वरीष्ठांकडे तक्रार द्या . तुम्हाला काम बोगस असले तरी ते थांबवता येत नाही . वन विभागात तुमच काय आहे . वरीष्ठाना तुम्ही लेखी तक्रार करा नंतर ते आम्हाला काम बंद करण्याचे सांगतील . तर वन विभागाच्या कामात ग्रामस्थांनी हस्तक्षेप करू नये असे उत्तर वनविभागाच्या अधिकाऱ्यासमोर गुत्तेदारानी दिले व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी निकृष्ट कामाला पाठीशी घालत नागरिकांना हुज्जत घालण्याचा प्रकार उमरावतीत घडला सदरील काम तात्काळ थांबून बोगस कामाची चौकशी करण्याची व त्यांना अभय देणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्या विरुध्द कार्यवाहीची मागणी नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे.



सदर काम निकृष्ट व गुणवत्ता पुर्वक होत नसल्याने अनेक नागरिकांनी ग्रामपंचायत सदस्य यांच्याकडे तोंडी तक्रार केली त्यानंतर ग्राम पंचायत सदस्य व प्रतिष्ठीत नागरिक कामावर गेले असता हे काम असेच सुरु राहिल असे सांगत गुत्तेदारानी व वन रक्षक यांनी तालुका वन अधिकाऱ्या समोर नागरिकांशी हुज्जत घातली .

- - - - - - - - - - -

सदर कामावर जे पोल निकृष्ट किंवा बोगस असेल ते बदलण्यासाठी मी गुत्तेदार यांना सांगितले असून अजुन आपण गुत्तेदारात पैसे दिलेले नाही . **रेखा बरबडे, तालुका वन अधिकारी फुलंब्री**

# वाघाने पाडला गायीचा फडशा

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपुर :** खुलताबाद तालुक्यातील खांडीपिपळगाव येथील शेतकरी मंजाराम बोरसे यांच्या मालकीच्या खांडीपिपळगाव येथील गट क्रंमाक २२९ गोठ्यातील सात ते आठ जनावरे बाधलेली होती. दि ४ रोजी रात्री वाघाने हल्ला केला. त्यामुळे गोठ्यातील जनावरे दावे तोडून वाटेल तिकडे पळून गेली, परंतु एक गाय गोळेगाव शिवारात पळून गेली तर ती गाय वाघाच्या तावडीत सापडली असता वाघाने तिचा गळा फोडल्याने ती मरण पावली आहे.

शेतकरी बोरसे हे सकाळी जनावरांना चारा पाणी करण्यासाठी तसेच दुध काढण्यासाठी उठले असता गोठ्यात जनावरे दिसली नाही. त्यांना वाटले आपले जनावरे चोरीला गेली कि काय परंतु शोध घेत असताना त्यांना वाघाच्या पाऊल असल्याचा संशय आला. हि बाब त्यांनी गावातील शेतकऱ्यांना सांगितले व जनावरांना शोधण्यासाठी गेले असता, गोळेगाव शिवारात मृत अवस्थेत गाय दिसली, वाघाने गायीला माळल्याचा संशय त्यांना आला. तात्काळ त्यांनी वनविभागाला कळविले. यामुळे शेकऱ्याचे पन्नास ते पच्चावन हजार रु किमतीचे नुकसान झाले. यांचे मोठे नुकसान झाले आहे. सध्या शेतकरी खरीपाच्या तयारीला लागले आहेत. मान्सूनचा पाऊस पडला की, शेतात पेरणीकरीता शेतकऱ्यांची शेतांकडे धाव असते. त्यानंतर पिकांच्या रखवालीकरीता अशातच शेतशिवारातही वाघ मुक्तसंचार करीत असल्याने या भागातील शेतकऱ्यांसह शेतमजुरांच्या



अडचणीत भर पडली आहे. विशेष म्हणजे या भागात अनेक दिवसांपासून वाघाचे दर्शन घडले असे ऐकायला मिळते. ही प्रकरणे दिवसेंदिवस वाढतच आहेत. परंतु, याकडे वनविभागाने सातत्याने दुर्लक्षच केले आहे. सध्या खरीप हंगाम जवळ आल्यामुळे शेतामध्ये मशागतीचे कामे करण्यासाठी शेतकरी जात आहेत. वाघाचा मुक्तसंचार सुरू असल्याने आता शेतकर्यांमध्ये पेरणीच्या तोंडावार वाघाची दहशत पसरली आहे. नुकसानग्रस्त पशुपालकालाशासकीय मदत देत वन्यप्राण्यांचा बंदोबस्त लावावा, अशी मागणी या भागातील नागरिक करीत आहेत.

# लोहा तालुक्यात सर्वदूर दमदार पाऊस; शेतकऱ्यांची पेरणीसाठी लगबग

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** जून महिन्यात मृग नक्षत्र कोरडा गेल्याने शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागले होते. मात्र मागिल दोन दिवसा पासुन दडी मारून बसलेल्या मृगराजाने तालुक्यात सर्वदूर जोरदार पावसाने हजेरी लावली आणि बळीराजा सुखावला असून कपाशी लागवड केलेल्या शेतकऱ्यांना आनंद झाला तर उर्वरित शेतकऱ्यांनी खोळंबलेल्या खरीप पिकांची पेरणी करण्यासाठी लगबग सुरू केली असल्याचे चित्र लोहा तालुक्यात सर्वदूर दिसून येत आहे.
मागील दोन दिवसांपासून पावसाने एन्ट्री केली असून मंगळवारी रात्री सर्वसाधारण तर बुधवारी रात्री उसंत घेत रात्रभर पावसाने दमदार हजेरी लावली. मृग नक्षत्र कोरडे गेल्याने खरिपातील मूग उडीद आदी तृणधान्य पिकांची पेरणी शक्य नसल्याचे मत कांहीं शेतकऱ्यांनी व्यक्त केले. पेरणीयोग्य नव्हे तर पाऊसच झाला नसल्याने खरिप हंगामातील पेरण्या खोळंबल्या होत्या. मात्र दोन दिवस झालेल्या पावसाने शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणीला सुरुवात केल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रारंभी पाऊस होईल या आशेने बळीराजाने कपाशी लागवड केली मात्र पाऊस झाला नसल्याने बळीराजा हवालदिल झाला होता. तालुक्यातील जवळपास तीन टक्केच पेरण्या उरकल्या होत्या. दोन दिवसांपासून दमदार पावसाने हजेरी लावल्यामुळे खोळंबलेल्या पेरणीला शेतकऱ्यांनी लगबग सुरू केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# लग्नास नकार; प्रेमी युगुलाने घेतले विष

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील मात्र उस्माननगर पोलिस ठाणे हद्दी अंतर्गत असलेल्या भोपाळवाडी येथे तरुणीच्या राहत्या घरी तरुणाने विषारी औषध घेवून जात बाथरूम मध्ये तरुण आणि तरुणीने अर्थात प्रियकर आणि प्रियासिने विषारी औषध प्राशन केले. त्यात तेवीस वर्षीय तरुणीचा उपचारादरम्यान नांदेड येथील शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला तर तरुणाची प्रकृती अत्यवस्थ असल्याचे सांगण्यात आले. तरुण आणि तरुणी हे अत्या मामाचे असल्याचे समजते. याप्रकरणी मयत तरुणीच्या आईने उस्माननगर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपी तरुण विरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
लोहा तालुक्यातील भोपाळ वाडी येथील पंचवीस वर्षीय तरुण रोहिदास पद्माकर जाधव याचे गावातच राहणाऱ्या अत्याची मुलगी सुप्रिया मारोती जाधव ( वय २३ ) हिच्याशी मागील कांहीं कालावधी पासून प्रेमसंबंध होते. तरुणाच्या वडिलांनी नात्याने चुलत बहीण असलेल्या लक्ष्मीबाई जाधव यांच्याकडे मुलगा रोहिदास व सुप्रियाचा विवाह करण्याची मागणी केली असता लक्ष्मीबाई यांनी विरोध दर्शविला. चिडलेल्या तरुण रोहिदास याच्या मनात विवाह होत नसल्याची सल झाल्याने त्याने दि. ३ जुलै रोजी मध्यरात्री साडे तीन वाजता घरात प्रवेश करून सुप्रिया हिस त्यांच्याच बाथरूम मध्ये घेवून जात शितपेया च्या बॉटल मध्ये घेवून गेलेले विषारी औषध सुप्रिया हिस पाजवून आपण स्वतः देखील ते प्राशन केले. कांहीं वेळानंतर सुप्रिया बाथरूम मधून बाहेर आली त्यापाठोपाठ रोहिदास देखील बाथरूम मधून बाहेर आला. कांहीं वेळानंतर तरूनीस उलट्या होत असल्याने तिची चौकशी केली असता. रोहिदास याने विषारी औषध पाजल्याचे तिने आईला सांगितले. असल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर तत्काळ तरुणीच्या कुटुंबीयांनी तिला विष्णुपुरी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र दि. ४ जुलै रोजी सकाळी साडेसात वाजता सुप्रिया मरण पावली. तर रोहिदास याच्यावर उपचार सुरू आहेत. सदरील घटनेप्रकरणी मयत तरुणीच्या आईने उस्माननगर पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून आरोपी तरूना विरुद्ध खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला.



# संवाद संस्थेमार्फत गोकुळ आश्रमात शैक्षणिक साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** संवाद संस्था नेहमीच उपेक्षित लोकांशी संवाद साधायचा प्रयत्न करीत असते. विशेष करून अशी माणसं जी समाजाकडून दुखावलेली, दुरावलेली तसेच अत्याचाराला बळी पडलेली असतात. नुकतेच गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून संवाद संस्थेने अमरावती येथील गुंजन ताई गोळे यांच्या गोकुळ आश्रमाला भेट दिली. गोकुळ आश्रमात एड्स बाधित, अनाथ, मुलं मुली आहेत. तसेच काही निराधार महिला देखील या आश्रमात आहे. येथील मुलांना संवाद संस्थेतर्फे शालेय साहित्याचे वाटप संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनंत देशमुख, उपाध्यक्ष सीमा देशमुख तसेच संस्थेचे सचिव प्रणव देशमुख, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रियांशु देशमुख व संचालिका सौ. अंजली देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी संवाद संस्थेमार्फत सिमा देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले तर संस्थेच्या संचालिका सौ. अंजली देशमुख यांनी मुलांसोबत गाण्याच्या माध्यमातून संवाद साधला. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अनंत देशमुख यांनी मुलांसोबत गाण्याच्या माध्यमातून संवाद संस्थेची भूमिका विशद केली.
या कार्यक्रमाचे आभार संस्थेचे सचिव प्रणव देशमुख यांनी व्यक्त केले. या संपन्न झालेल्या कार्यक्रमाला गोकुळ संस्थेचे पदाधिकारी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी संवाद संस्थेचे संचालक श्रीकांत देशमुख, संचालिका आशा देशमुख, श्री प्रणव देशमुख, प्रियांशु देशमुख, सौ. अंजली देशमुख,सीमा देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# अवघ्या दोन तासात आरोपी देवपूर पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** देवपूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत चंदन नगर भागात मोठी चोरी झाल्याने तक्रारदाराने तात्काळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवण्यासाठी धाव घेतली व चोरीच्या दोन तासात आरोपी व चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दिनांक ०३ रोजी रात्री ०२.०० वाजेच्या सुमारास देवपूर भागात चंदन नगर येथे आरोपीने फिर्यादी हे घरात झोपलेले असताना घरात घुसुन चोरी केली होती. सदर चोरीत एकुण ३३२००/- रु किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ३ मोबाईल, चांदीचा कंमर पटटा, चांदीचा छल्ला, चांदीचा साखळ्या तसेच रोख रुपये १९०००/- चोरु नेले होते फिर्यादीने पो.स्टे ला तक्रार दिल्यानंतर चोरटया विरुध्द देवपूर पो.स्टे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. अवघ्या दोन तासात आरोपीतास देवपुर पो.स्टे चे शोध पथकातील अंमलदार यांनी आरोपी नामे तोसीफ ऊर्फ पापा भिकन तांबोळी यास अटक करुन त्याचे कडुन गुन्हयातील चोरीस गेलेला माल हस्तगत केला आहे. ३ मोबाईल, चांदीचा कंमर पटटा, चांदीचा छल्ला, हस्तगत करुन गुन्हा उघडकीस केला.

सदरची कामगीरी ही संजय बारकुंड सो पोलीस अधीक्षक धुळे, किशोर काळे सो अपर पोलीस अधिक्षक धुळे व मा.एस.ऋषीकेश रेडडी सहा, पोलीस अधीक्षक सो धुळे शहर विभाग धुळे यांचे मार्गदर्शन खाली देवपुर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सचिन बेंद्रे साहेब, तसेच राजेश इंदवे, मिलींद सोनवणे, योगेश कचवे, पो.ना.शशींकात देवरे, मुकेश वाघ, प्रल्हाद वाघ, किरणकुमार साळवे, अशानी गुन्हा उघडकीस आणला आहे.



गुरूपौर्णिमे निमित्ताने शाहू विद्यालयाचे शिक्षक तथा प्रसिध्द साहित्यिक, कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांचा सत्कार करताना शाहू विद्यालय जायकवाडी (उत्तर) च्या विद्यार्थीनी दिसत आहेत.

# सोन्याच्या हव्यासापोटी ८५ वर्षी वृद्धेचा खून

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** तालुक्यातील सुलतानपूर येथे मंगळवारी रात्री दहा वाजेच्या दरम्यान बांडा शिवरात राहत असलेल्या चंद्रभागाबाई पाराजी सुरूसे आपल्या स्वतःच्या शेतामध्ये कोठ्यावर रहात होत्या. मंगळवार हा बाजारचा दिवस असल्यामुळे त्यांच्या सोबतीला असलेले हे बाजारानिमित्त गावात गेले होते. आरोपी मारुती प्रल्हाद पानझडेने (वय ४६ वर्ष) चंद्रभागाबाई पाराजी सुरवसे यांना मारहाण करून जीव मारून त्यांच्या अंगावर असलेली दाग दागिने काढून घेतले. पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने त्यांच्या अंगावर गोधडी आणि इतर कपडे टाकून पेटवून देण्याचा प्रयत्न केला. त्या ठिकाणाहून पसार झाला. पोलिसांना माहिती मिळाल्या बरोबर आरोपीला ताब्यात घेऊन घटनास्थळावर पंचनामा करून गुन्हा दाखल केला. सदर आरोपी हा गुंड प्रवृत्तीचा असून त्याच्यावर अनेक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल आहेत, अशी पोलीस प्रशासनाकडून माहिती मिळाली या ठिकाणी पीआय राजेश शिंगटे एपीआय अमर नागरे एएसआयरामेश्वर कोरडे एनपीसी राजेश जाधव, मोहम्मद परसुवाले, खालिद खान हे घटनास्थळावर सर्व पंचनामा करतेवेळी उपस्थित होते. पुढील तपास पोलीस प्रशासन करत आहे.

# संमेलनाध्यक्षपदी डॉ. मनोहर नाईक, तर उद्घाटक कीर्ती गवई अर्जुन

## अमरावती येथे आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज





**यवतमाळ :** अ. भा. आंबेडकरी साहित्य आणि संस्कृती संवर्धन महामंडळाचे तिसरे आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलन अमरावती येथील भीमटेकडी परीसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवनात २३ जुलै रोजी आयोजित करण्यात आले असून संमेलनाचे आयोजन प्रा. सतेश्वर मोरे स्मृती प्रतिष्ठान ही स्थानिक संस्था करणार आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध लेखक आणि विचारवंत प्रा. डॉ. मनोहर नाईक यांची निवड करण्यात आली असून उद्घाटन किर्ती गवई अर्जुन यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती महामंडळाचे निमंत्रक प्रशांत वंजारे यांनी दिली आहे. संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले डॉ. मनोहर नाईक हे कवी, समिक्षक आणि वक्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. विविध वाङ्मयीन पुरस्काराचे मानकरी असलेल्या नाईक यांचे युद्धशाळा, मूल्यजागर, नवीन शैक्षणिक धोरणाचा पंचनामा, बहुजन समाजाचे राजकीय अस्तित्व इत्यादी महत्वाची पुस्तके प्रसिद्ध आहेत. संमेलनाच्या उद् घाटक असणाऱ्या किर्ती गवई अर्जुन या शिक्षण तज्ञ असून विविध सामाजिक, शैक्षणिक संस्था आणि चळवळीशी जुळलेल्या आहेत. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदाची जबाबदारी ज्येष्ठ आंबेडकरी कार्यकर्त्या कुंदाताई सोनुले या सांभाळणार आहेत. आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलनात प्रामुख्याने शिक्षण, शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्या अनुषंगाने गंभीर चर्चा होणार असून त्या अनुषंगाने एका परिचर्चेचे आयोजन करण्यात आले आहे. परिचर्चेच्या अध्यक्षस्थानी डॉ. शाम मुडे हे असणार आहेत. डॉ. प्रमोद नारायणे, माजी शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर, प्रा. सज्जाद अहमद खान, अनिरुद्ध महाजन, मिलिंद भेले आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. कवी संजय ओरके यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होणार असून महाराष्ट्रातील युवा कवी यात सहभागी होतील. समारोपीय कार्यक्रमात महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. सीमा मेश्राम विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी विविध समित्या गठीत केल्या असून संमेलनाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. संमेलनाला उपस्थित राहून सहकार्य करण्याचे आवाहन संयोजक आर. एस. तायडे, गणेश लांडगे, माया वासनिक गेडाम, निर्मलताई काळबांडे, वर्षाताई इंगळे, पुष्पाताई बोरकर, विलास थोरात, राजेश गरूड, संजय मोखडे, संघपाल सरदार, धर्मशील गेडाम आदींनी केले आहे.

# कविता पावसाच्या विषयावर आधारित काव्य स्पर्धेकरिता कविता पाठविण्याचे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** पहिल्या पावसाच्या गंधाने उजळून निघालेली ही धरणी निसर्गातल्या प्रत्येक चैतन्याला भूरळ पाडतेच मग त्यापासून मानवी मन कसं सुटेल मनातल्या अंतरंगाची एक एक पाकळी बाजूनं सारून या दीप्तीमान पावसाचं सोंदर्य लुटायला उत्सुक असणाऱ्या. त्या सर्व कवींनी आपल्या मनात दाटत असलेला पावसाळा अलगद लेखणी उचलून कोऱ्या कागदावर ओसंडू द्या..संवेदना फाउंडेशन, परिवर्तन प्रबोधिनी व सृजन साहित्य संघ, शाखा अमरावती च्या सयुक्त विद्यमाने दि. 23.जुलैला होणाऱ्या काव्यमहोत्सवाचं औचित्य साधून भव्य काव्यस्पर्धेचं आयोजन करण्यात आले असून 'पाऊस' या मध्यवर्ती संकल्पना घेऊन ही स्पर्धा आयोजित केली आहे. त्यासाठी आपल्याला 9960937769 या मोबाईलवर कविता पाठवता येईल.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर